बी.एम. प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य
बी. एम. प्रतिष्ठान
संस्थापक अध्यक्ष
बाळासाहेब भगवानराव मस्के

दैनिक बीड
# पुण्यभूमी
संपादक : बाळासाहेब मस्के

बीड | सोमवार, दि.१ जुलै २०२४ | वर्ष ३ रे | अंक ३४० वा | पाने ६ | दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... पुण्यभूमी | https://epaper.punyabhumi.com | RNI No: MAHMAR/2021/81902

## परळीत गोळीबार ; एक ठार, एक जखमी

परळी : शहरात दिवसेंदिवस गोळीबाराच्या घटना वाढतच असून पुन्हा आज परळी मध्ये गोळीबार झाला दोन गटातील वाद टोकाला गेल्यामुळे हा गोळीबार झाल्याची समजते या गोळीबारामध्ये परळी तालुक्यातील मरळवाडी येथील सरपंच यांचा मृत्यू झाला असून अन्य एक जण जखमी झाले आहेत या घटनेमुळे परळी शहरात खळबळ. परळी शहरामध्ये पुन्हा गोळीबार झाल्या आहे . यात मरळवाडी येथील युवा सरपंच बापु आंधळे यांचा मृत्यू झाला . यासह यात अजून एक जण जखमी झाल्याची माहिती आहे . घटनास्थळी पोलीस पोहोचले असून पुढील तपास सुरु आहे . गोळीबार कोणत्या कारणाने झाला हे मात्र समजू शकले नाही .

# कुंडलिकच्या कामगिरीचा मुक्काम पोलीस कोठडीत

कुंडलिक खंडेंना पक्षातून दिले हाकलून • कथित ऑडिओ क्लिपने कुंडलिक गोत्यात? • ३०७ च्या गुन्ह्यात पोलिसांनी घेतले ताब्यात! • बीड कोर्टाने सुनावली तीन दिवसांची कोठडी

**बीड / पुण्यभूमी प्रतिनिधी**

एकनाथ शिंदे गटाचे बीड शिवसेना जिल्हाप्रमुख कुंडलिक खांडेला पोलिसांनी शुक्रवारी जामखेडमधून मध्यरात्री अटक केली होती. त्यानंतर बीड कोर्टात शनिवारी हजर केले, असता तीन दिवसाची पोलीस कोठडी न्यायालयाने दिली. दरम्यान मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी खांडेची पक्षातून तसेच पदावरुन हकालपट्टी केली आहे.

लोकसभा निवडणुकीत महायुतीच्या उमेदवाराला धोका देवून मविआच्या उमेदवारासाठी कशा पद्धतीने काम केले याची क्लिप वायरल होताच कुंडलिक खांडे याला बीड ग्रामीण पोलिसांनी कलम 307 च्या गुन्ह्यात आरोपी म्हणून नाव असल्याने काल मध्यरात्री अटक केली. आपल्याच पक्षाच्या उपजिल्हा प्रमुखावर जीवघेणा हल्ला केल्याच्या प्रकरणात खांडे हा आरोपी आहे. तीन महिने जुन्या प्रकरणात स्थानिक गुन्हे शाखेने शनिवारी पहाटे कुंडलिक खांडेला अटक केले. पंकजा मुंडेंचा राजकीय विश्वासघात, धनंजय मुंडेंची गाडी फोडण्याचा कट आणि मनोज जरांगे यांच्याबद्दल एकेरी वक्तव्याच्या क्लिपमुळे वादग्रस्त ठरलेला शिवसेना जिल्हाप्रमुख कुंडलिक खांडेवर कायद्याचा फास आता आवळला जात आहे. इतके दिवस सत्ताधारी पक्षाचा जिल्हाप्रमुख असल्याने खांडेला पोलिसांकडून अभय मिळत होते. मात्र सरकारने सूचित करताच कुंडलिक खांडेला अटक झाली. खांडेवर असलेल्या आता सर्व गुन्ह्यात त्याला आता सुटका नाही. उलट आणखीन वेगवेगळ्या प्रकरणात त्याला कसे अडकविता येईल हे आता पोलिसासमोर आव्हान असणार आहे. एकूणच कुंडलिक खांडेच्या अडचणी आता आणखीनच वाढणार आहेत, असेच म्हणावे लागेल.




### कुंडलिकला पक्षातून हाकलून दिले

शिवसेना शिंदेगटाचे जिल्हा प्रमुख कुंडलिक खांडे गेल्या काही वषार्पासुन नेहमीच कोणत्यान कोणत्या वादात अडकलेले आहेत . त्यात त्यांची एक ऑडिओ क्लिक व्हायरल झाली होती . यात पंकजा मुंडे यांना धोका दिला, धनंजय मुंडे यांच्या गाडीवर दगड मारुत यासह इतर विषयावर चर्चा होती . याच अनुषंगाने खांडेंवर पक्ष कारवाई करेल अशी शक्यता होतीच . अखेर पक्षाने त्यांच्यावर कारवाई करत, पक्षातून हकालपट्टी केली आहे .



### पोलीस कोठडीनंतर काय?

कुंडलिक खांडे याला तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे . त्यानंतर पुन्हा बीड कोर्टात हजर केलं जाणार आहे . ३०७ च्या गुन्ह्यात कोर्ट काय निकाल देते . याकडे मात्र सर्वांचे लक्ष लागले आहे . दरम्यान दोन दिवसांपूर्वीच कुंडलिक खांडे याच्यावर सामाजिक सलोखा व मनोज जरांगे यांच्याबद्दल एकेरी उल्लेख केला म्हणून गुन्हा दाखल झाला होता . त्यामुळे कुंडलिक खांडे आता चांगलेच गोत्यात अडकले आहेत .



### ...म्हणे चार महिन्यांपुर्वीच जराजीनामा दिला होता?

स्थानिकच्या काही लोकांनी आपल्या विरुध्द पक्षश्रेष्ठींचे कान भरले होते . बीड विधानसभा निवडणूकीसाठी मी जोरदार तयारी केलेली असताना पक्षाने बीड विधानसभा क्षेत्र दुर्सयाला दिल्याने आपण चार महिन्यापुर्वीच खा .श्रीकांत शिंदे व शिवसेना सचिव संजय मोरे यांची भेट घेवून शिवसेनेच्या जिल्हाप्रमुखपदाचा राजीनामा दिला होता . त्यामुळे शिवसेनेतून माझी हकालपट्टी झाली असा दावा साफ चुकीचा आहे असे स्पष्टीकरण कुंडलिक खांडे यांनी दिले . दरम्यान राजकिय निर्णय प्रसार माध्यमांना कळविणार असल्याचे कुंडलिक खांडे यांनी म्हंटले .

## पुरस्कार ऊर्जा व प्रेरणा देणारा

**डॉ.दादाहरी कांबळे : अंबाजोगाईत रामचंद्र इंगळे पुरस्कार सोहळा**



**आंबेजोगाई /पुण्यभूमी प्रतिनिधी**

रामचंद्रजी इंगळे यांचे कार्य दिशादर्शक आणि दीपस्तंभाप्रमाणे प्रकाशमान असल्याचे प्रतिपादन अंबाजोगाईचे माजी नगराध्यक्ष राजकिशोर(पापा) मोदी यांनी केले. ते मा. रामचंद्रजी इंगळे सामाजिक सेवा पुरस्कार प्रदान सोहळ्यात बोलत होते.

छत्रपतीशिवराय-फुले-शाहू-आंबेडकरी पुरोगामी विचारधारा अंगीकारून मा.रामचंद्रजी इंगळे सामाजिक सेवा प्रतिष्ठान,अंबाजोगाई जि.बीड ही संस्था कार्यरत आहे.आंबेडकरी चळवळीतील तत्वनिष्ठ आधारस्तंभ स्मृतिशेष रामचंद्र इंगळे (अप्पा )यांनी कर्तृत्त्वसंपन्न जिल्हा परिषद सदस्य (बीड ) म्हणून राजकीय झ्रसामाजिक क्षेत्रात अतुलनीय योगदान दिले. स्मृतिशेष रामचंद्र इंगळे (अप्पा ) यांच्या वैचारिक भूमिकेची शिदोरी घेऊन कार्यरत असणाऱ्या व्यक्ती व संस्थेची दखल घेऊन त्यांना मा.रामचंद्रजी इंगळे सामाजिक सेवा प्रतिष्ठानतर्फे दरवर्षी सन्मानित करण्यात येते. मा.रामचंद्रजी इंगळे सामाजिक सेवा प्रतिष्ठान,अंबाजोगाई संस्थेच्या माध्यमातून दरवर्षी दिल्या जाणारा मा.रामचंद्रजी इंगळे सामाजिक सेवा पुरस्कार-२०२४ हा सामाजिक-शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे ज्येष्ठ शिक्षणतज्ञ, आदर्श शिक्षक,समाजभूषण माजी प्राचार्य डॉ .दादाहरी कांबळे यांना देवून गौरवण्यात आले .

मा. रामचंद्रजी इंगळे सामाजिक सेवा पुरस्कार समाजोपयोगी कार्य करण्याची ऊर्जा व प्रेरणा देणारा असल्याचे प्रतिपादन प्राचार्य डॉ.दादाहरी कांबळेयांनी केले. अंबाजोगाई येथे संपन्न झालेल्या या पुरस्कार प्रदान सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी राजकिशोर (पापा) मोदी (श्री.बालाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक-सचिव तथा माजी नगराध्यक्ष न.प.अंबाजोगाई )तसेच ज्येष्ठ नेते ॲड.अनंतराव जगतकर,प्राचार्य डॉ.डी. एच.थोरात,डी.जी.धाकडे, ॲड.श्याम तांगडे,प्रा व्ही. बी.चव्हाण, डॉ.मधुकर कांबळे, सुधीर फुलारी, डॉ. दिलीप गायकवाड, सी.व्ही.गायकवाड, महादेव आदमाने, लंकेश वेडे,भारत सातपुते,ताराचंद शिंदे, संतोष सिनगारे, धम्मपाल सरवदे, सुनिल वाघाळकर यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रतिष्ठानच्या माध्यमातून सामाजिक-शैक्षणिक-सांस्कृतिक-राजकीय क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या चळवळीतील सामाजिक योगदान देणाऱ्या व्यक्तीस अथवा सामाजिक संस्थांच्या कायार्चा यथोचित गौरव व्हावा यासाठी प्रतिष्ठानच्या वतीने २०१९ पासून हा पुरस्कार देण्याचे कार्यान्वीत केले आहे.२०१९ मध्ये आंबेडकरी चळवळीतील ज्येष्ठ नेते स्मृतिशेष एन. के.सरवदे (आप्पा) यांना तर २०२० मध्ये ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते भानुदासजी देवरवाडे,२०२१मध्ये वैद्यकीय क्षेत्रात कार्य करणारे डॉ.मधुकर कांबळे,२०२२ मध्ये ज्येष्ठ भीमगीत गायक नागनाथ जोगदंड,२०२३ मध्ये सहकार व सामाजिक क्षेत्रात कार्य करणारे अल्पसंख्याकांचे हितचिंतक स्मृतिशेष ख्वाजा बशीरोद्दिन ख्वाजा मोइनोद्दीन यांना प्रदान करण्यात आलेला आहे. २०२४ सालचा पुरस्कार ज्येष्ठ शिक्षणतज्ञ प्राचार्य डॉ.दादाहरी कांबळे यांना मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. मा.रामचंद्रजी इंगळे सामाजिक सेवा पुरस्कार या पुरस्कार सोहळ्याचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रा. डॉ.सिद्धार्थ तायडे,तर आभार संस्थापक सचिव बालासाहेब इंगळे यांनी मानले.मानपत्र वाचन बळीराम जोगदंड यांनी केले.उपाध्यक्ष प्राचार्य डॉ. रमेश इंगोले तसेच सर्व पदाधिकाऱ्यांनी डॉ. डी. ए.कांबळे यांचे अभिनंदन केले आहे. या पुरस्कार सोहळ्यास पत्रकार दादासाहेब कसबे,जगन सरवदे,परमेश्वर गित्ते,कारभारी शिनगारे,विजय रापतवार,सुनील व्यवहारे,गोविंदराव सोनवणे, व्यंकट वेडे,नामदेव आचार्य,बाबासाहेब समुद्रे, बाबुराव कांबळे,देविदास घोबाळे,प्रा. कालिदास सुरवसे,डॉ. डी. आर.शिंदे, माणिक शिंदे,बबन पानकोळी,बापु सरवदे,बुद्धकरण जोगदंड,गंगाधर जोगदंड, मुकुंद भागवत,प्रा. बी. एम. खरात,बालाजी अंबाड,मुन्ना वेडे, केवळबाई इंगळे, वंदना इंगळे,जयश्री सिरसाट,कांताबाई बनसोडे, लता सोनवणे,सविता इंगले,आशाबाई सरवदे,प्रा.उषा कांबळे, डॉ.भारती इंगळे-सोनवणे,डॉ. आकाश सोनवणे,अशोक सोनवने,महादेव भालेराव, स्वीतम इंगळे, रोहन इंगळे,भूषण इंगळे यांचेसह नागरिकांची उपस्थिती होती.

## केज नगर पंचायत हद्दीत घाणीचे साम्राज्य !

**केज/पुण्यभूमी प्रतिनिधी**

केज येथील वार्ड क्रमांक १६ मध्ये घाणीचे प्रचंड साम्राज्य पसरले असून त्या कडे नगरपंचायत जाणूनबुजून दुर्लक्ष करत आहे.वार्ड क्रमांक १६ मध्ये नालीतून कचरा काढला नसल्यामुळे नाल्या तुबल्या आहेत त्यामुळे नाल्यात कचरा अडकून पाणी साचले आहे. त्यामुळे डेंगू , चिकणगुण्याच्या रुग्णात वाढ झाली असून अर्ध्या पेक्षा नागरिक चिकनगुण्या अजाराने त्रस्त आहेत. हे फक्त वार्ड क्रमांक १६ च नाहीतर पुर्ण केज शहरात हीच परिस्थिती आहे. प्रत्येक वार्डात घाणीचे साम्राज्य पसरले आहे.

नगरपंचायत ने कुठलेच पावसाळी कामे केली नाहीत. गल्ली बोळात रस्ते नाहीत. गेल्या आडिच वर्षांपासून कॉंग्रेस-जनविकास आघाडी ची सत्ता नगरपंचायत वर आहे. कॉंग्रेस शहराध्यक्ष ताहेर खुरेशी यांना नगरपंचायत च्या विरोधात उपोषणाला बसावे लागत असेल तर नगरपंचायत गेल्या



अडीच वर्षांत काय काम केले हे शहरातील सुज्ञ नागरिकांना सागावे लागत नाही.शहराध्यक्ष ताहेर खुरेशी यांनी २/७/२०२४ पंर्यत नगरपंचायत ने वार्ड क्रमांक १६ मधील नाली, पाण्याची पाईपलाईन, विहीरीत घाण पाणी जाऊन साचले आहे ते स्वच्छ नाही केले तर २ तारखे पासुन नगरपंचायत समोर आमरण उपोषणास बसतील असा इशाराच दिला आहे. सत्ताधारी पक्षाच्या शहराध्यक्ष नेच अंदोलन करणार म्हणल्यावर नगरपंचायत काय भुमीका घेते हे बघने अवचित्याचे ठरेल.

## कामे न करता निधी केला हडप !

**चर्चा : आ .नमितांची अनेक कामे कागदोपत्रीचं**

**केज/पुण्यभूमी प्रतिनिधी**

केज तालुक्यातील आमदारा नमीता मुंदडा यांनी आमदारा फंडातून आलेले कामे वेगवेगळ्या योजने अंतर्गत होनारे कामे आमदारा नमीता मुंदडा यांनी भोगस केलेले आहे व काही कामे तर फक्त कागदोपत्रीच दाखवून निधी हडपण्याचे काम आमदारा नमीता मुंदडा यांनी केल्याचे चर्चा सत्र नागरिकांन मध्ये सुरू झाले आहे.



आमदारा नमीता मुंदडा यांनी काही कामाचे तर फक्त उद्धाटन करण्यात आले आहेत. काम मात्र सुरू नाहीत अशा प्रकारचे मनमानी पद्धतीने कामे आमदारा नमीता मुंदडा यांनी केले आहेत तर काही ग्रामपंचायत अंतर्गत होनारे कामे आमदारा नमीता यांनी दडमशाहीने अडवली असल्याचे निदर्शनास येत आहे तर काही कामे आमदारा नमीता मुंदडा यांना टक्केवारी दीली नाही म्हणून अडवण्यात आले असल्याचे नागरिकांन कडुन व्यक्त करण्यात येत आहे तरी ऐवढा नालायक पनाचा कळस आमदारा नमीता मुंदडा यांनी गाठला आहे की आमदारा नमीता मुंदडा यांना मतदारांच्या दारात सुध्दा उभा राहायची लायकी नाही ऐवढा भ्रष्टाचार केज अंबाजोगाई विधानसभा मतदारसंघाच्या विद्यमान आमदार यांनी केलेला आहे व आमदारा नमीता मुंदडा यांना ऐवढा भ्रष्टाचार करत असताना बीड जिल्ह्यातल्या माजी खासदार मात्र मुगीळुन गप्प बसलेल्या होत्या .

## गरजु विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप

**कौतुकास्पद : सिंदफणा पब्लिक स्कूलचा आदर्श उपक्रम**



**माजलगाव / पुण्यभूमी प्रतिनिधी**

येथील माजलगाव विकास प्रतिष्ठान, लोकनेते सुंदरराव सोळंके नागरी सहकारी पतसंस्था माजलगाव आणि सिंदफणा पब्लिक स्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने आधार प्रकल्पांतर्गत गरजु विद्यार्थ्यांना दरवर्षी प्रमाणे या वर्षी सुध्दा शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले.

सविस्तर वृत्त असे की, माजलगाव विकास प्रतिष्ठान गेल्या २० वषार्पासून गरजु विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप, शैक्षणिक सहल, महिला मेळावा, दिवाळी फराळ वाटप अशा विविध कार्यक्रमाचे आयोजन करत आलेले आहे. प्रतिष्ठान द्वारे जवळ जवळ ४०० विद्यार्थ्यांना या वर्षी शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले. माजलगाव प्रतिष्ठानच्या सचिव नीला देशमुख यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविकपर भाषणात प्रतिष्ठान करत असलेल्या कायार्चा अहवाल सादर केला. सुरेश भानप यांनी माजलगाव प्रतिष्ठान ने बालविवाह रोखण्यासंबंधी घेतलेल्या पुढाकाराने कौतुक केले. सुप्रसिद्ध उद्योजक तथा लेखक शरद तांदळे यांनी मुलांना या संधीचे सोने करावे असे सांगून तुमच्यातील काही जण भविष्यात यशस्वी अधिकारी होतील अशी अपेक्षा व्यक्त केली. माजलगाव विकास प्रतिष्ठानच्या अध्यक्षा मंगलाताई सोळंके आपल्या अध्यक्षीय भाषणात म्हणाल्या की, आधार प्रकल्पांतर्गत सुरू असलेल्या कार्यात माझा सदैव हातभार राहील. यावेळी प्रदूमन भोसले, ऋतुजा अर्गडे, रोशनी उजगरे या विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्यात आले. माजलगाव विकास प्रतिष्ठानच्या अध्यक्षा मंगलाताई सोळंके,नीला देशमुख, सुप्रसिद्ध उद्योजक शरद तांदळे, लेखक अभिषेक अवचार , स्टेट बँक ऑफ इंडियाचे सेवानिवृत्त वरिष्ठ अधिकारी सुरेश भानप, प्राचार्य अन्वर शेख, लोकनेते सुदंरराव सोळंके बँकेचे कार्यकारी अधिकारी सुहास सोळंके, महादेव वाघ उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी लोकनेते सुदंरराव सोळंके पतसंस्थेचे सर्व कर्मचारी, सिंदफणा पब्लिक स्कूल चे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

**हनिट्रॅप... माजी आ .भिमराव धोंडेंना एक कोटी खंडणीची मागणी**

# अश्लील व्हिडिओ व्हायरल करण्याची धमकी!

**पाटोदा /पुण्यभूमी प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील आष्टी मतदारसंघातील माजी आमदार भीमराव आनंदराव धोंडे यांना अश्लील व्हिडिओ व्हायरल करण्याची धमकी देत तब्बल एक कोटी रुपयांच्या खंडणीची मागणी करण्यात आल्याची गंभीर बाब उजेडात आली आहे. या प्रकरणी अहमदनगर येथील दोन महिलांसह तीन जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपींत एका युट्यूबव पत्रकाराचा समावेश असल्याची माहिती आहे.

पोलिसांच्या माहितीनुसार, माजी आमदार भीमराव आनंदराव धोंडे यांना अश्लील व्हिडिओ व्हायरल करण्याची धमकी देत एक कोटी रुपयांच्या खंडणीची मागणी करण्यात आली आहे. हा घटनाक्रम जानेवारी ते २६ जून दरम्यान हॉटेल रॉयल येथे घडली. या प्रकरणी नगरमधील गायकवाड व बांगर (पूर्ण नाव समजले नाही) या दोन महिलांसह, इस्माईल दयार्नी उर्फ भैया बॉक्सर नामक एका यूट्यूब पत्रकाराविरोधात कोतवाली पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



### काय म्हटले आहे फिर्यादीत?

प्रस्तुत आरोपींनी संगनमत करून आमच्याकडे फियार्दीची अश्लील व्हिडिओ क्लिप आहे . ती सोशल मीडियावर व्हायरल करून तुमची बदनामी करू . तसेच तुमच्या विरोधात अत्याचाराचा गुन्हा देखील दाखल करून तुमचे राजकीय कारकीर्द संपून टाकू, अशी धमकी देत एक कोटी रुपयांची खंडणी मागितली . यातील २५ हजार रुपये माजी आमदार धोंडे यांचे स्वीय सहाय्यक जफर शेख यांच्याकडून इस्माईल दयार्ने उर्फ भैया बॉक्सर यांनी स्वीकारले आहेत, असे माजी आमदार धोंडे यांनी आपल्या फियार्दीत म्हटले आहे .आरोपी इस्लाईल दयार्ने उर्फ भैया बॉक्सर हा एका न्यूज पोर्टलचा पत्रकार आहे . त्याची कोतवाली पोलिस ठाण्यात सतत ये-जा सुरू होती . पण आता त्याच्यावरच खंडणीचा गुन्हा दाखल झाल्यामुळे मोठी खळबळ माजली आहे .

### अगोदर महाराज आता भक्त ..

याअगोदर पाटोदा तालुक्यातील गहिनीनाथ गडाचे मठाधिपती महंत विठ्ठल महाराज यांच्या बाबतीत अश्लिल व्हिडिओ लिक नकरण्याची धमकी येऊन लाखोंची खंडणी वसूल केली होती .यातील आरोपींना नाशिक येथे लग्न समारंभात अंमळनेर पोलिसांनी मोठ्या शिताफीने पकडले होते .यात एका महिलेचा समावेश होता .आता महाराजांचे निस्सिम भक्त असलेले भिमराव धोंडे यांच्या अश्लिल व्हिडिओ लिकचा प्रकार घडला आहे .यातही दोन महिलांचा समावेश आहे .

### ओबीसी नेत्यांचे करिअर संपवण्याचे षडयंत्र

बीड लोकसभा मतदार संघाच्या निवडणुकीच्या नंतर बीड जिल्ह्यातील सामाजिक व राजकीय वातावरण कलुषित झाले आहे .यात अनेक ओबीसी नेत्यांना टार्गेट केले जात आहे .माजी आ भिमराव धोंडे हे एक ओबीसी सर्वश्रुत नेते आहेत .पंकजा मुंडे यांचे विश्वासू शिल्लेदार म्हणुन त्यांची ख्याती आहे .परिणाम भिमराव धोंडे यांचे राजकीय भवितव्य धोक्यात आणण्यासाठी हे षडयंत्र आहे . **- पांडुरंग नागरगोजे, जिल्हा सरचिटणीस भाजपा,बीड जिल्हा**

# स्वप्नपूर्ती!

क्रिकेट हा भारतासाठी केवळ खेळ नाही, तर इथली चौथी मूलभूत गरज आहे, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. भारतातील मैदान संस्कृती पाहिली तरी या गोष्टी सहज समजतील. इथले चिमुरडे बॅट आणि बॉल हातात घेऊनच वाढत असतात. या खेळाचे उद्गातेपण इंग्लंड मिरवत असले तरी क्रिकेटची पंढरी म्हणून भारताकडेच अंगुलीनिर्देश केले जातात. यावरूनच भारतीय नसानसात हा खेळ किती भिनला आहे याचा प्रत्यय येतो. जूनच्या पहिल्या आठवड्यात आयसीसी टी-२० विश्वचषक २०२४ स्पर्धेला सुरुवात झाली. स्पर्धेआधीपासूनच विजेतेपदाचे दावेदार म्हणून भारताकडे अभिमानाने पाहिले गेले; परंतु गेल्या काही वर्षांतील आयसीसीच्या स्पर्धा पाहिल्या तर हेच दावेदारपण सिद्ध करण्यात भारतीय संघाला अपयश येत होते. मोक्याच्या सामन्यात सुमार कामगिरीचा फटका बसून हातातोंडाशी आलेले घास हिरावून घेतले गेले. त्यामुळे जोवर कप तोंडाला लावत नाही तोवर चहा आपला मानण्यात योग्यता नसते. तसेच जेतेपदाचा चषक उंचावत नाही तोवर तो आपला म्हणण्यात अर्थ नसतो, हा धडा भारतीय खेळाडूंसह चाहत्यांच्याही चांगलाच अंगवळणी पडला आहे. वर्ष २०११ नंतर एकदिवसीयच नाही, तर टी-२० विश्वचषकाचाही टिळा माथी लावण्यात टीम इंडियाला अपयश आले होते. २०१३ नंतर आयसीसीच्या विजेतेपदाची ट्रॉफी भारताला हुलकावणी देत होती. ताटात नाही, तोंडात नाही, तर घशात गेलेला घास प्रतिस्पर्धी संघांनी हिसकावून घेतला आहे. त्यामुळे दक्षिण आफ्रिकेच्या चोकर्स डागाची लागण भारतालाही लागली होती. हा डाग पुसून टाकण्याचा सर्वंकष प्रयत्न केला; परंतु गेल्या ११ वर्षांत ते यश भारतीय संघाला आले नाही. संघ मजबूत होता. मात्र निर्णायक क्षणी गडबड होऊन सामना हातून निसटून जायचा. टी-२० विश्वचषक २०२४ स्पर्धेच्या अंतिम सामन्यात भारतीय संघ विजेतेपदाच्या निर्धारानेच मैदानात उतरला होता. त्यात त्यांना अखेर यश आले.

शनिवारी अंतिम सामन्याचा थरार भलताच लहरी होता. कधी तो भारताच्या बाजूने वळायचा, तर कधी दक्षिण आफ्रिकेचे पारडे जड करून जायचा. नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीला आलेल्या भारताची सुरुवात निराशाजनक झाली. सामन्याच्या सुरुवातीची ४ षटके दक्षिण आफ्रिकेची होती. मात्र सामन्याच्या शेवटची ४ षटके भारताने आपल्या नावे केली आणि तीच निर्णायक ठरली. संपूर्ण स्पर्धेत अपयशी असलेला विराट कोहली अंतिम सामन्यात संकटमोचन ठरला. विराट-अक्षरची उपयुक्त भागीदारी, जसप्रीत बुमराहने गरजेच्या वेळी घेतलेला विकेट, अर्शदीप सिंग, हार्दिक पंड्या यांची निर्णायक गोलंदाजी आणि सूर्यकुमार यादवने पकडलेला तो विलक्षण झेल या गोष्टी भारताच्या विजयात लक्षवेधी ठरल्या. शो पीसमध्ये साठवून ठेवण्यासारख्या या गोष्टी होत्या. विशेष म्हणजे रोहित शर्माच्या नेतृत्वगुणाचे करावे तेवढे कौतुक कमीच ठरेल. त्याने संपूर्ण स्पर्धेत घेतलेले निर्णय भारताच्या पथ्यावर पडले. हार्दिकची निवड आणि संधी, बुमराहकडून योग्य वेळी करून घेतलेली गोलंदाजी, अपयशानंतरही विराट कोहलीला सलामीवीर म्हणून कायम ठेवणे, अंतिम सामन्यात संघ संकटात असताना अक्षरला वर फलंदाजीला पाठवण्याचा घेतलेला निर्णय असे रोहितचे एकापेक्षा अनेक निर्णय फलद्रुप ठरले. त्याचीच परिणती विजेतेपदात झाली. विशेष म्हणजे या संपूर्ण स्पर्धेत भारताने एकही सामना गमावलेला नाही. हाही एक प्रकारे विक्रमच आहे.

भारताने पटकावलेला हा विजय भारतासाठी केवळ विजय नाही, तर करोडो चाहते, खेळाडू यांची 'स्वप्नपूर्ती' आहे. वारंवार हुलकावणी देत असलेल्या जेतेपदाला गुडघे टेकायला लावणारा हा विजय आहे. शनिवारी मध्यरात्री भारतीय रस्त्यांवर असंख्य चाहत्यांनी जल्लोष साजरा केला, हे त्याचेच प्रतिबिंब आहे. त्या चाहत्यांच्या मनातील भावना होत्या. गेल्या ११ वर्षांच्या निराशेचा उपवास संपला आणि अपयशाचा दुष्काळ जेतेपदाच्या पुरात अक्षरशः वाहून गेला. संकल्पसिद्धी कशी करावी याचा धडा हा अंतिम सामना देऊन गेला. या एका विजयात अनेक प्रश्नांची उत्तरे मिळाली. रोहित शर्मा, विराट कोहली हे दिग्गज खेळाडू कारकिर्दीच्या अखेरच्या टप्प्यात (विराट आणि रोहित यांनी या स्पर्धेनंतर टी-२० क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर केली आहे.) आहेत. द वॉल राहुल द्रविड यांनीही आधीच मुख्य प्रशिक्षकपदाचा राजीनामा दिला आहे. त्यामुळे प्रशिक्षक म्हणून त्यांचा हा अखेरचा विश्वचषक आहे. या सर्वांसाठी हा विश्वचषक अविस्मरणीय ठरला. विश्वचषक जिंकल्यामुळे रोहित, विराट आणि द्रविड या दिग्गजांसाठी ही ‘शान से’ एक्झिट आहे. एरवी खेळ खराब करणाऱ्या पावसाने शनिवारी मात्र विश्रांती घेतली होती. पण रविवारी भारतात ठिकठिकाणी मुसळधार पावसाने हजेरी लावली. दिवसभर तो मनसोक्त कोसळला. कदाचित नियतीही या विजयाने खूश झाली असणार. तिने साठवून ठेवलेले आनंदाश्रू दुसऱ्या दिवशी पाऊसरूपी बरसले. अंतिम सामन्यानंतर खेळाडूंसह चाहत्यांनाही अश्रू अनावर झाले. स्वप्नपूर्ती झाल्याचा हा फिल होता. जिंकलात मित्रांनो, जवळपास एका तपाचा दुष्काळ तुम्ही संपवलात. या जगज्जेतेपदानंतर भारतीयांच्या मनामनात ‘थँक यू टीम इंडिया’ अशाच भावना होत्या.

# व्यंकय्या गारू-भारताच्या सेवेसाठी समर्पित जीवन

*भारताचे माजी उपराष्ट्रपती आणि आदरणीय राजकीय नेते एम. व्यंकय्या नायडू गारू आज ७५ वर्षांचे होत आहेत. मी त्यांना दीर्घ आणि निरोगी आयुष्यासाठी शुभेच्छा देतो आणि त्यांच्या सर्व हितचिंतकांना आणि समर्थकांना देखील शुभेच्छा देतो. ज्या नेत्याचा जीवन प्रवास समर्पण, अनुकूलता आणि जनतेच्या सेवेप्रती अविचल बांधिलकीचे दर्शन घडवतो, अशा नेत्याचा सन्मान करण्याचा हा एक प्रसंग आहे. राजकीय क्षेत्रातील त्यांच्या सुरुवातीच्या काळापासून ते उपराष्ट्रपती म्हणून त्यांच्या कार्यकाळापर्यंत, व्यंकय्या गारू यांची कारकीर्द भारतीय राजकारणातील गुंतागुंतींना सहजतेने आणि विनम्रतेने हाताळण्याच्या त्यांच्या असामान्य क्षमतेचा दाखला देते. त्यांचे वक्तृत्व, विद्वत्ता आणि विकासाच्या मुद्द्यांवर सातत्याने असलेला भर यामुळे त्यांना सर्वच पक्षांकडून आदर प्राप्त झाला आहे.*

● ● ●



**माजी उपराष्ट्रपती एम. व्यंकय्या नायडू यांच्या वयाच्या पंच्याहत्तरीनिमित्तत्य पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लिहिलेला लेख....**

व्यंकय्या गारू आणि माझा अनेक दशकांपासूनचा परिचय आहे. आंध्र प्रदेशातील विद्यार्थी राजकारणातील एक विद्यार्थी नेते म्हणून सक्रिय झाल्यावर विविध प्रश्नांवर सक्रिय राहण्याची त्यांची वाटचाल सुरू झाली आणि राजकीय जीवनाला प्रारंभ झाला. त्यांची प्रतिभा, वक्तृत्व आणि संघटनात्मक कौशल्ये लक्षात घेता, कोणत्याही राजकीय पक्षात त्यांचे स्वागतच झाले असते; परंतु ते ‘राष्ट्र प्रथम’ या दृष्टिकोनातून प्रेरित असल्यामुळे त्यांनी संघ परिवारासोबत काम करण्यास प्राधान्य दिले. त्यांनी रा. स्व. संघ, अभाविप या संघटनेसोबत काम केले आणि त्यानंतर त्यांनी जनसंघ आणि भाजपाला बळकट केले. सुमारे ५० वर्षांपूर्वी जेव्हा आणीबाणी लागू करण्यात आली, तेव्हा युवा व्यंकय्या गारू यांनी आणीबाणीविरोधी चळवळीत स्वतःला झोकून दिले. त्यांना तुरुंगवास झाला होता आणि ते देखील का तर त्यांनी लोकनायक जयप्रकाश नारायण यांना आंध्र प्रदेशात आमंत्रित केले म्हणून. लोकशाहीप्रति असलेली ही बांधिलकी त्यांच्या राजकीय कारकिर्दीत वारंवार दिसून येईल. १९८०च्या दशकाच्या मध्यावर, जेव्हा एनटीआर यांचे सरकार काँग्रेसने कोणताही विधिनिषेध न बाळगता बरखास्त केले, तेव्हा लोकशाही मूल्यांचे रक्षण करण्याच्या चळवळीत ते अग्रस्थानी होते. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीच्या महाकाय लाटांमध्येही अगदी सहजतेने तरून जाण्यात व्यंकय्या गारू नेहमीच यशस्वी ठरले. १९७८ मध्ये आंध्र प्रदेशाने काँग्रेसला मतदान केले; परंतु त्यांनी हा कल बदलून टाकला आणि ते तरुण आमदार म्हणून निवडून आले. पाच वर्षांनंतर, जेव्हा आंध्रात एनटीआर यांची त्सुनामी आली, तेव्हा देखील ते भाजपाचे आमदार म्हणून निवडून आले, ज्यामुळे राज्यभर भाजपाच्या वाढीचा मार्ग मोकळा झाला.



**पंतप्रधान नरेंद्र मोदी**

ज्यांनी व्यंकय्या गारू यांना बोलताना ऐकले असेल त्यांना त्यांच्या वक्तृत्व कौशल्याचा प्रभाव जाणवला असेल. ते नक्कीच एक शब्दप्रभू आहेत पण तितकेच ते कार्यप्रभू देखील आहेत. एक युवा आमदार असण्याच्या दिवसांपासून त्यांनी विधान मंडळातील कामकाजात जे परिश्रम घेतले आणि आपल्या मतदारसंघातील लोकांच्या समस्यांना आवाज दिला त्याबद्दल ते आदराला पात्र ठरले. एनटीआर यांच्यासारख्या दिग्गजाने देखील त्यांच्या प्रतिभेची दखल घेतली आणि अगदी त्यांना सुद्धा व्यंकय्या त्यांच्या पक्षात यावेत असे वाटत होते, मात्र व्यंकय्या गारू यांनी त्यांच्या मूळ विचारधारेपासून विचलित होण्यास नकार दिला. आंध्र प्रदेशात भाजपाला बळकट करण्यात आणि या पक्षाला गावोगावी पोहोचवण्यात आणि सर्व स्तरातील लोकांना यामध्ये सामावून घेण्यात मोठी भूमिका बजावली. त्यांनी विधानसभेच्या सदनात पक्षाचे नेतृत्व केले आणि आंध्र प्रदेश भाजपाचे ते अध्यक्ष देखील बनले. १९९० मध्ये भाजपाच्या केंद्रीय नेतृत्वाने व्यंकय्या गारूंच्या प्रयत्नांची दखल घेतली आणि १९९३ मध्ये पक्षाच्या अखिल भारतीय सरचिटणीसपदावर त्यांची नेमणूक केली त्यामुळे राष्ट्रीय राजकारणातील त्यांच्या वाटचालीचा प्रारंभ झाला. २००० मध्ये जेव्हा अटलजी व्यंकय्या नायडू यांना त्यांच्या सरकारमध्ये मंत्री बनवण्यासाठी आग्रही होते त्यावेळी व्यंकय्या गारू यांनी तातडीने ग्रामीण विकास मंत्रालयाला त्यांची पसंती असल्याचे त्यांना कळवले. यामुळे अटलजींसह सगळेच संभ्रमात पडले. शेवटी, कोणते मंत्रालय हवे आहे असे येथे एका नेत्याला विचारले जात होते आणि त्यांची पहिली पसंती ग्रामविकास होती. पण, व्यंकय्या गारू यांचे विचार स्पष्ट होते, ते किसानपुत्र होते आणि त्यांनी आपले सुरुवातीचे दिवस खेड्यात व्यतीत केले होते. त्यामुळे त्यांची ज्या एखाद्या क्षेत्रात काम करण्याची इच्छा होती ते ग्रामीण विकास क्षेत्र होते. मंत्री या नात्याने ‘प्रधानमंत्री ग्रामीण सडक योजना’ ही संकल्पना आणि त्याच्या कार्यान्वयनाशी ते जवळून जोडले गेले होते. अनेक वर्षांनंतर, २०१४ मध्ये राष्ट्रीय लोकशाही आघाडी (एनडीए) सरकारने पदभार स्वीकारला तेव्हा त्यांनी नगर विकास, गृहनिर्माण आणि शहरी दारिद्र्य निर्मूलन या महत्त्वाच्या खात्यांची जबाबदारी सांभाळली. २०१४ मध्ये मी जेव्हा दिल्लीत आलो तेव्हा गेल्या दीड दशकांपासून गुजरातमध्ये काम केलेला, मात्र राष्ट्रीय राजधानीत मी बाहेरचा व्यक्ती होतो. अशा काळात व्यंकय्या गारू यांचे अंतरंग जाणून घेणे अगदी सुलभ होते. ते एक प्रभावी संसदीय कामकाज मंत्री होते. ते द्विपक्षीयतेचे मूलतत्त्व जाणून होते, मात्र त्याचवेळी संसदीय नियम आणि निकषांच्या बाबतीत त्यांनी एक मर्यादा आखली होती.

आमच्या आघाडीने २०१७ मध्ये त्यांना आमचे उपराष्ट्रपतीपदाचे उमेदवार म्हणून नामनिर्देशित केले. व्यंकय्या गारू यांचे सरकारमधील महत्त्वाचे स्थान भरून काढणे कसे अशक्य आहे याचा विचार करताना आम्हाला पेचप्रसंगाचा सामना करावा लागला, मात्र त्याचवेळी, उपराष्ट्रपतीपदासाठी त्यांच्यापेक्षा चांगला उमेदवार कोणी नाही हे देखील आम्हाला ज्ञात होते. मंत्रीपदाचा आणि खासदारकीचा राजीनामा देताना त्यांनी केलेले भाषण आपण कधीच विसरू शकत नाही. उपराष्ट्रपती पदाचा पदभार स्वीकारल्यानंतर त्यांनी विविध पावले उचलली. ज्यामुळे कार्यालयाची प्रतिष्ठाही वृद्धिंगत झाली. युवा खासदार, महिला खासदार आणि पहिल्यांदाच खासदार झालेल्यांना बोलण्याची संधी मिळावी याची दक्षता घेणारे असे ते राज्यसभेचे उत्कृष्ट सभापती होते. कलम ३७० आणि ३५(ए) रद्दबातल करण्याचा निर्णय राज्यसभेच्या पटलावर ठेवण्यात आला तेव्हा व्यंकय्या गारू अध्यक्षस्थानी होते. डॉ. श्यामा प्रसाद मुखर्जी यांच्या अखंड भारताच्या स्वप्नाकडे आकर्षित झालेला हा युवक हे स्वप्न जेव्हा प्रत्यक्षात उतरले तेव्हा अध्यक्षस्थानी असल्याने हा त्यांच्यासाठी खूप भावनिक क्षण ठरला असेल याची आपल्याला खात्री आहे. कार्य आणि राजकारणाव्यतिरिक्त, व्यंकय्या गारू हे उत्तम वाचक आणि लेखक देखील आहेत. वैभवशाली तेलुगू संस्कृती दिल्लीतील लोकांसाठी शहरात आणणारी व्यक्ती म्हणून ते ओळखले जातात. त्यांचे उगाडी आणि संक्रांतीचे कार्यक्रम हे नक्कीच शहरातील सर्वांना प्रिय संमेलनांपैकी एक आहेत. व्यंकय्या गारू यांना आपण नेहमीच खाद्यपदार्थांची आवड जोपासणारे आणि लोकांचे यजमानपद करणारे म्हणून ओळखतो; परंतु काहीशा उशिराने, त्यांचे स्वनियंत्रण देखील सर्वांच्या निदर्शनास आले आहे. ते अजूनही बॅडमिंटन कसे खेळतात आणि वेगाने चालण्याच्या आनंदात कसे रममाण होतात यावरून शरीर स्वास्थ्याबाबत त्यांची बांधिलकी दिसून येते.

उपराष्ट्रपतीपदाची धुरा सांभाळल्यानंतरही व्यंकय्या गारू हे सार्वजनिक जीवनात सक्रिय सहभाग घेत आहेत. त्यांचे जिव्हाळ्याचे विषय तसेच देशभरात घडणाऱ्या विविध घडामोडींबाबत ते मला फोन करतात आणि आपल्याकडून त्याविषयी जाणून घेतात. अगदी अलीकडे आमचे सरकार तिसऱ्यांदा पदावर आल्यावर मी त्यांना भेटलो. ते आनंदित झाले होते आणि त्यांनी मला आणि आपल्या सहकाऱ्यांना शुभेच्छा दिल्या. या त्यांच्या एकूणच मैलाचा दगड ठरलेल्या कारकिर्दीसाठी मी त्यांना पुनश्च एकवार शुभेच्छा देतो. मला आशा आहे की युवा कार्यकर्ते, निवडून आलेले प्रतिनिधी आणि सेवा करण्याची आवड असलेले सर्वजण त्यांच्या जीवनातून प्रेरणा घेऊन ती मूल्ये आत्मसात करतील. त्यांच्यासारखे लोकच आपल्या देशाला अधिक चांगले आणि चैतन्यशील बनवतात.

# इंडस्ट्री फ्रेंडली ‘महाराष्ट्र’ !

*महाराष्ट्रात उत्तम पायाभूत सुविधांचे जाळे, कुशल मनुष्यबळ असल्याने औद्योगिक विस्ताराला चालना मिळाली आहे. थेट परकीय गुंतवणुकीत महाराष्ट्र देशात अग्रसेर आहे. दोन वर्षांत दावोसमध्ये ५ लाख कोटींच्या परदेशी गुंतवणुकीचे करार झाले. ‘इंडस्ट्री फ्रेंडली’ ही महाराष्ट्राची ओळख आम्ही पुन्हा प्रस्थापित करीत आहोत. राज्याला १ ट्रीलियन डॉलर्स इकॉनॉमी बनविण्याचा निर्धार आम्ही नक्की पूर्ण करू. आज दोन वर्षपूर्तीनिमित्त याविषयी सांगताहेत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे...*

● ● ●



गेल्या दोन वर्षांत आपला महाराष्ट्र सर्वंच क्षेत्रात नंबर वन आहे. काही महिन्यांपूर्वी डीपीआयआयटीने अहवाल जारी केला असून १ लाख कोटीपेक्षा अधिक थेट परकीय गुंतवणूक (एफडीआय) महाराष्ट्रात आली आहे. त्यामुळे थेट परकीय गुंतवणुकीत देशात महाराष्ट्र नंबर वन आहे. ८ लाख कोटी रुपयांची पायाभूत सुविधांची कामे राज्यात सुरू आहेत. पायाभूत सुविधांच्या कामात महाराष्ट्र नंबर वन आहे. निर्यातीमध्ये, स्टार्टअपमध्येही महाराष्ट्र नंबर वन आहे. देशातील सर्वाधिक लांबीचा सागरी सेतू आपण उभारला तिथेही महाराष्ट्र नंबर वन आणि मुंबई-पुणे मिसिंग लिंकचा टनेल उभारण्यातही आपला महाराष्ट्र नंबर वन आहे. अशी कितीतरी क्षेत्र आहेत ज्यात महाराष्ट्र अग्रेसर आहे. उद्योग बाहेर गेले असा आरोप करणाऱ्यांसाठी ही आकडेवारी डोळ्यांत अंजन घालणारी आहे. आमच्या सरकारच्या काळात उद्योजकांचा राज्यावरील विश्वास आणि आपली पत वाढली आहे. उद्योगस्नेही (इंडस्ट्री फ्रेंडली) ही महाराष्ट्राची ओळख आम्ही पुन्हा प्रस्थापित केली. उद्योग बाहेर जात असतील तर एवढी गुंतवणूक राज्यात कशी काय आली, असा प्रश्न मला विरोधकांना विचारावासा वाटतो. सुरजागड प्रकल्पाचे काम आम्ही सुरू केले. देशातला पहिला ग्रीन हायड्रोजनचा प्रकल्प महाराष्ट्रात येतोय. अशाप्रकारे उद्योग उभारणीचे काम आम्ही करत आहोत.

महिला लघुउद्योजकांसाठी या आर्थिक वर्षापासून “पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महिला स्टार्टअप योजना” सुरू करण्यात येणार आहे. स्टार्टअपच्या आनुषंगाने अखिल भारतीय स्तरावरील महासंमेलन राज्यात आयोजित करण्यात येईल. हरित हायड्रोजनच्या उत्पादनासाठी विकासकांसोबत झालेल्या सामंजस्य करारांनुसार २ लाख ११ हजार ४०० कोटी रुपयांची गुंतवणूक होणार असून त्याद्वारे ५५ हजार ९०० रोजगार निर्माण होणार आहेत. नवी मुंबई येथे २५ एकर जागेवर “इंडिया जेम्स ॲण्ड ज्वेलरी पार्क” नियोजित आहे. त्यात २ हजार सूक्ष्म, लघू व मध्यम उद्योग घटकांचा समावेश असून ५० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक होणार आहे. त्यातून एक लाख रोजगार निर्माण होणार आहे. वस्त्रोद्योग धोरण २०२३ ते २०२८ जाहीर करण्यात आले आहे. या अंतर्गत पाच वर्षांत २५ हजार कोटी रुपयांची भरीव गुंतवणूक आणि ५ लाख रोजगार अपेक्षित आहेत. “कॅप्टिव्ह मार्केट योजने” मुळे सूतगिरणी, यंत्रमाग, प्रोसेसिंग, पॅकिंग तसेच वाहतूक क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्माण होणार आहेत. खासगी गुंतवणूक वाढविण्यासाठी लघु-वस्त्रोद्योग संकुले तसेच टेक्निकल टेक्स्टाईल पार्क उभारण्याचे शासनाने ठरविले आहे.



**एकनाथ शिंदे**
**मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य**

मला दोन वर्षांत दोन वेळा दावोसच्या जागतिक आर्थिक परिषदेत उपस्थित राहण्याची संधी मिळाली. दावोस येथे जानेवारी २०२३ मध्ये १ लाख ३७ हजार कोटींच्या गुंतवणुकीसाठी सामंजस्य करार झाले. त्यापैकी ८७ हजार कोटींच्या प्रकल्प उभारणीस सुरुवात देखील झाली असून भूखंड वाटप करण्यात आले. यावर्षी जानेवारी २०२४ मध्ये दावोसमध्ये ३ लाख ७२ हजार कोटी डॉलर्सचे सामंजस्य करार झाले त्या माध्यमातून २ लाख रोजगार निर्माण होण्यास मदत होणार आहे. महाराष्ट्राला भारताचे ग्रोथ इंजिन म्हटले जाते. हे ग्रोथ इंजीन वेगाने दौडावे अशी योजना आम्ही अमलात आणत आहोत. आज देशातील सर्वाधिक पायाभूत सुविधांची कामे महाराष्ट्रात सुरू आहेत हे मी मोठ्या अभिमानाने सांगतो. राज्यात ८ लाख ३५ हजार कोटी रुपये खर्चाची विक्रमी विकासकामे सुरू आहेत. या प्रकल्पांसाठी चालू आर्थिक वर्षाच्या अर्थसंकल्पात ५३ हजार ५७ कोटींची तरतूद केलेली आहे. ही सर्व कामे निर्धारित वेळेत पूर्ण करण्याचा प्रयत्न आहे. त्यासाठी केंद्र सरकारचे भक्कम पाठबळ आहेच. त्याशिवाय डबल इंजिन सरकारमुळे राज्याची विश्वासार्हता वाढली असून महाराष्ट्राची ‘पत’ ही सुधारल्यामुळे आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्थासुद्धा प्रकल्प पूर्ण करण्यासाठी सहकार्याचा हात पुढे करत आहेत. देशातील आणि जगभरातील उद्योग क्षेत्रासाठी महाराष्ट्र हे आकर्षणाचे केंद्र आहे. मजबूत असे पायाभूत सुविधांचे जाळे आणि कुशल मनुष्यबळ, यामुळे गुंतवणुकीसाठी आणि रोजगार निर्मितीसाठी महाराष्ट्राला पसंती दिली जाते. पायाभूत सुविधा जर भक्कम असतील तर परदेशी गुंतवणूकदारही तिथे आकर्षित होतात. अडीच वर्षांच्या सरकारच्या काळात परदेशी गुंतवणुकीत महाराष्ट्र दुसऱ्या आणि तिसऱ्या क्रमांकावर फेकला गेला होता. गुजरात आणि कर्नाटकनेही आपल्याला मागे टाकले होते; परंतु गेल्या वर्षभरात राज्याने पुन्हा पहिल्या क्रमांकावर झेप घेतली आहे. आज महाराष्ट्र परदेशी गुंतवणुकीत नंबर वन आहे याचाही मला अभिमान आहे.

महाराष्ट्रातील पायाभूत सुविधांचे प्रकल्प आणि राज्याचा विकासाचा वेग हे परस्पर पूरक आहेत. हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्ग त्याचे उत्तम उदाहरण आहे. समृद्धी महामार्ग विदर्भ, मराठवाड्यासह संपूर्ण राज्याच्या समृद्धीची भाग्यरेषा ठरणार आहे. अटल सेतू, कोस्टल रोड या सर्व महत्त्वाकांक्षी प्रकल्पांसह मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावरील मिसिंग लिंक, विरार-अलिबाग मल्टिमोडल कॉरीडोर, मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन, रेवस ते रेड्डी, सिंधुदुर्ग सागरी महामार्ग यासोबतच राज्यामध्ये ५ हजार किलोमीटरचे एक्सेस कंट्रोल महामार्ग तयार केले जाणार आहेत. मुंबई, नवी मुंबई, नागपूर, पुणे, नाशिक ही महानगरेच नव्हे तर राज्यातील खेड्यापाड्यांतील पायाभूत सुविधांचे जाळे भक्कम करण्यासाठीही ठोस आणि सर्वंकश प्रयत्न केले जात आहेत. नवीन माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा धोरण आम्ही केले. त्यातून ९५ हजार कोटींची गुंतवणूक आकर्षित होईल. राज्याचे पहिले निर्यात प्रोत्साहन धोरण देखील आम्ही आणले. त्याद्वारे अंदाजे रुपये २५ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक होईल, असा मला विश्वास आहे. महाराष्ट्रात नाशिक, जळगाव, सांगली, अकोला, हिंगोली, रत्नागिरी, रायगड, भिवंडी, पुणे येथे ९ लॉजिस्टिक्स पार्क उभारण्यात येणार आहेत. जालना येथे ‘मल्टिमॉडेल लॉजिस्टिक पार्क’ उभारण्यासाठी नॅशनल हायवेज लॉजिस्टिक मॅनेजमेंट लिमिटेड आणि जवाहरलाल नेहरू पोर्ट अथॉरिटी यांच्यामध्ये सामंजस्य करार, रांजणगाव येथे महाराष्ट्रातील पहिला इलेक्ट्रॉनिक्स मॅन्युफॅक्चरिंग क्लस्टर (EMC) प्रकल्प होत आहे. पहिल्या टप्प्यातील ६२ कोटी ३९ लाख रुपयांचा निधी केंद्र सरकारकडून एमआयडीसीकडे वर्ग करण्यात आला आहे.

मुख्यमंत्री रोजगार निर्मितीतून बारा हजारांहून अधिक उद्योजकांना कर्ज मंजूर करण्यात आले. एक लाखाहून अधिक युवकांच्या हातांना काम मिळणार आहे. कृषी, ऑटोमोबाइल, उद्योग क्षेत्रातील उद्योजकांना उद्‌भणाऱ्या समस्या ‘संकल्प’ प्रकल्पाद्वारे केंद्राकडून सोडविले जाणार आहेत. महाराष्ट्र उद्योग, व्यापार, गुंतवणूक सुविधा केंद्र कायद्यामुळे उद्योगासाठी ११९ सेवा सुलभ आणि अधिक वेगवान झाल्या आहेत. उद्योगांना परताव्याचे दावे मंजुरीसाठी औद्योगीक प्रोत्साहन अनुदान कालावधी दोन वर्षांनी वाढविला. मित्रासारखी संस्था, महाराष्ट्र आर्थिक सल्लागार परिषदेची स्थापना करण्यात आली. देशाची अर्थव्यवस्था फाईव्ह ट्रिलियन डॉलर्सपर्यंत पोहोचावी यासाठी त्यांनी आत्मनिर्भर भारताचा आग्रह धरला आहे. त्याला अनुसरून अनेक योजना, धोरणांची आखणी केली आहे. महाराष्ट्रानेसुद्धा या उद्दिष्टात योगदान देण्यासाठीचे नियोजन केले असून राज्याची अर्थव्यवस्था एक ट्रिलियन डॉलर्सपर्यंत विस्तारण्याचा प्रयत्न आमचे सरकार नेटाने करत आहे. अधिक सधन, अधिक सुफल अशा महाराष्ट्राचे एक सुंदर स्वप्न साकार करण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.

# अनधिकृत बांधकामे, फेरीवाल्यांवर पालिकेचा हातोडा

**मुंबई डॉट कॉम**
**अल्पेश म्हात्रे**

मुंबईत बेकायदा बांधकामांचे इमले उभे राहिले जात असताना त्याकडे दुर्लक्ष केले जाते. मात्र घरात किरकोळ दुरुस्तीचे काम सुरू होताच मुंबई महापालिका, पोलीस यंत्रणांना सुगावा लागतो. संबंधित यंत्रणांचे अधिकारी काम सुरू असलेल्या ठिकाणी धडकतात आणि काही वेळात पुन्हा माघारी परततात. त्यात आता पालिकेने अनधिकृत फेरीवाल्यांविरोधात कारवाईचा धडाका सुरू केला. ‘फेरीवालामुक्त परिसर’ मोहीम अंतर्गत गेल्या आठ दिवसांत एका आठवड्यात विविध विभागांच्या ठिकाणी अतिक्रमण निर्मूलन कार्यवाही पार पडली. या कार्यवाहीत फेरीवाल्यांकडून सुमारे ३ हजार साधनसामग्री जप्त करण्यात आली आहे. त्यात ७१३ चारचाकी हातगाड्या, १ हजार ३७ घरगुती गॅस सिलिंडर आणि १ हजार २४६ व इतर विविध प्रकारच्या साहित्याचा समावेश आहे. मात्र एकीकडे घाटकोपर येथे अनधिकृत होर्डिंग उभे राहिले ते पडून अनेकांचा मृत्यू झाला. मात्र तेथे कोणावरही कारवाई झालेली आठवत नाही, तर दुसरीकडे गरीब विक्रेत्यांच्या रोजी-रोटीवर अशा प्रकारे गडांतर आणणे पालिकेच्या कोणत्या धोरणात बसते हा एक प्रश्नच आहे.

मुंबईकर नागरिकांना पदपथ आणि रस्त्यांचा वापर करताना अडथळा ठरणाऱ्या तसेच आरोग्यासाठी अपायकारक अशा पद्धतीने उघड्यावर अन्न पदार्थांची विक्री करणाऱ्या फेरीवाल्यांविरोधात पालिकेमार्फत सातत्याने कारवाई केली जाते. मुंबई शहरातील अनधिकृत फेरीवाल्यांविरोधातील कारवाईविषयी समन्वय ठेवण्याच्या दृष्टीने महानगरपालिका प्रशासन आणि मुंबई पोलीस यांची संयुक्त बैठक महानगरपालिका मुख्यालयात पालिका आयुक्त व इतर शासकीय यंत्रणा यांची एक सभा नुकतीच





पार पडली. मात्र मुंबई शहरातील सद्यपरिस्थिती पाहता खरेच या अशा बैठकांमधून काही खरेच निष्पन्न होत आहे का, या अशा बैठकांमधून काही एक ठरावीक वर्गालाच टार्गेट तर केले जात नाही ना, असाही प्रश्न पडल्यावाचून राहत नाही.

मुंबई महापालिकेतर्फे आता अनधिकृत बांधकामांची तक्रार मिळाली की, कारवाईचा बडगा उगारण्यात येतो, हे कंगणा रणावतच्या पालीहिल येथील चेतक रो हाऊस कार्यालयातील अनियमित बांधकामावर पालिकेचा हातोडा पडला त्यावेळी दिसून आले. राणावतच्या कार्यालयातील अनियमित बांधकामांवर हातोडा पडला आणि मुंबईतील अनधिकृत बांधकामांचा प्रश्न पुन्हा एकदा चर्चेत आला खरा. मुंबईत एक लाखांहून अधिक अनधिकृत बांधकामे असून त्यावर तोडक कारवाई मात्र शून्य. भूमाफिया, काही भ्रष्ट अधिकारी आणि जागेच्या लालसेपोटी मिळेल तिकडे कब्जा करणारे काही मुंबईकर यामुळे मुंबईत सर्रास अनधिकृत बांधकामे उभारली जातात. मुंबई बेकायदा बांधकाम मुक्त करण्यासाठी सेलिब्रिटी, नेते मंडळी यांच्या घरात नियमबाह्य बांधकाम असल्यास कारवाईची फक्त ओरड दिसून येते. त्यामुळे मुंबईत बेकायदा बांधकामे भ्रष्ट अधिकारी, राजकारण्यांमुळे झपाट्याने पसरत असून 'कायद्या'नेच अनधिकृत बांधकाम सुरू आहे, असे म्हणावे लागते.

मुंबईत मोकळी जागा मिळेल तिकडे बेकायदा बांधकामे होत असून त्यावर कारवाई करण्याकडे पालिकेच्या अतिक्रमण निर्मूलन विभागाचे दुर्लक्ष दिसून येते. मुंबईचा विकास ज्या वेगाने होत आहे, त्याच गतीने अनधिकृत बांधकामेही केली जातात. अनधिकृत बांधकामे असो वा अनधिकृत फेरीवाले तक्रार आली की, कारवाईचा दिखावा केला जातो. कारण काही वेळातच कारवाई केलेल्या जागेवर अतिक्रमण होते. त्यामुळे बेकायदा बांधकामांवर कारवाईचा बडगा न उगारता काही भ्रष्ट अधिकारी जाणीवपूर्वक कानाडोळा करतात हेही तितकेच खरे. प्रत्येक गोष्ट नियमात राहून करण्याचा इशारा मुंबई महापालिका प्रशासनाकडून दिला जातो; परंतु याच पालिकेतील काही भ्रष्ट अधिकारी पैशाच्या लालसेपोटी नियमांना केराची टोपली दाखवतात. मुंबईत अनधिकृत बांधकामांमध्ये वाढ होत आहे. मुंबईत उभारण्यात येणारे टॉवर, गगनचुंबी इमारती याला मुंबई महापालिका प्रशासनाच्या इमारत विभाग व अग्निशमन दलाचे ना हरकत प्रमाणपत्र लागते. अनेक गोष्टींची पडताळणी केल्यानंतरच या यंत्रणांकडून ओसी व एनओसी दिली जाते. मात्र एखादी घटना घडल्यावरच कळते की, कुठलीही पाहणी न करता संबंधित यंत्रणांनी रितसर परवानगी दिली. याचाच अर्थ काही पैशांसाठी काही भ्रष्ट अधिकारी सर्वसामान्यांच्या जीवाशी खेळत आहेत. मुंबईतील नागरिकांना पदपथ सहजपणे वापरता यावेत, तसेच रस्त्यांवरील वाहतूक कोंडी टाळण्यासाठी पदपथ अतिक्रमण मुक्त राहतील, या आनुषंगाने उपाययोजना करण्याच्या सूचना पालिकेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिल्या आहेत. मात्र याचा फटका आपले काही गरीब विक्रेत्यांना बसतो. असे म्हणतात की, मुंबई कधी कोणाला उपाशी ठेवत नाही मात्र पालिकेच्या कारवाईमुळे मुंबईतील तळातील व्यक्ती आता उपाशी राहील की काय असे वाटू लागले आहे. आज समाजातील एका वर्गाला बाहेरचे व स्वस्त दरात मिळणारे अन्न हाच एक पर्याय असतो मात्र पालिकेच्या कृतीमुळे त्या वर्गाची मोठी गैरसोय होणार आहे. हॉटेलमधले खाणे परवडत नाही आणि बाहेर कोणती सोय नाही. अशा लोकांनी करायचे तरी काय. आज मुंबई उपनगर येथील बोरिवली, ठाणे, बांद्रा यांसारख्या ठिकाणी रस्त्यावर दुकाने थाटून धंदे केले जातात. मात्र वारंवार कारवाई दादरसारख्या मराठमोळ्या ठिकाणीच करण्यात येते. एकाला एक नाही व दुसऱ्याला दुसरा न्याय्य असे तरी पालिकेने करू नये हीच अपेक्षा सर्वसामान्यांकडून व्यक्त होत आहे.

## राशिभविष्य | सोमवार, १ जुलै २०२४

### ॥ पंचांग ॥

आज मिती ज्येष्ठ कृ. दशमी शके १९४६, चंद्र नक्षत्र अश्विनी ०६.२५ पर्यंत नंतर भरणी, योग् सुकर्मा, चंद्र रास मेष. सोमवार, दिनांक १ जुलै २०२४, सूर्योदय ०६.०४, सूर्यास्त ०७.२०, चंद्रोदय ०२.३०, उद्याची चंद्रास्त ०३.०० राहू काळ ०७.४३ ते ०९.२३. महाराष्ट्र कृषी दिन, डोक्टोर्स दे, चार्टेड अक्कौंटेंट डे.

### ॥ भविष्य ॥

**मेष** - महत्त्वाची कामे करताना लक्षपूर्वक करावी लागणार आहेत.

**वृषभ** - आपण आज उत्साही व प्रसन्न असणार आहात.

**मिथुन** - नोकरीत उत्तम स्थिती असणार आहे.

**कर्क** - धार्मिक कामाला प्राधान्य द्याल.

**सिंह** - महत्त्वाचे निर्णय पुढे ढकला.

**कन्या** - जोडीदाराची साथ चांगली मिळणार आहे.

**तूळ** - नोकरीमध्ये कामाचा ताण जाणवणार आहे.

**वृश्चिक** - आरोग्याच्या तक्रारी कमी होणार आहेत.

**धनू** - घरासंबंधी काम पूर्ण कराल.

**मकर** - मनासारखी कामे होणार आहेत.

**कुंभ** - कुटुंबातील व्यक्तींशी संवाद साधाल.

**मीन** - नवीन ओळखी होतील

# ओम बिर्लांचा विक्रम





स्टेटलाइन

डॉ. सुकृत खांडेकर

अठराव्या लोकसभा अध्यक्षपदावर भाजपाचे ओम बिर्ला यांची बिनविरोध निवड झाली आणि लागोपाठ दुसऱ्यांदा लोकसभा अध्यक्ष होण्याचा सन्मान त्यांना मिळाला. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि विरोधी पक्षनेते राहुल गांधी हे दोघेही बिर्ला यांना अध्यक्षपदाच्या आसनापर्यंत घेऊन गेले व त्यांना सन्मानाने त्या जागेवर बसवले. बिर्ला यांची निवड आवाजी मतदानाने झाली, त्यावेळी विरोधी पक्षातून मतविभागणीची मागणी करण्यात आली नाही, यांचे अनेकांना आश्चर्य वाटले. खरे तर लोकसभा अध्यक्षपदासाठी काँग्रेसने के. सुरेश यांना उमेदवार म्हणून जाहीर केले होते, त्यांचा उमेदवारी अर्जही दाखल केला होता. तृणमूल काँग्रेस वगळता अन्य विरोधी पक्षांनी के. सुरेश यांच्या उमेदवारीला पाठिंबा दिला होता; पण ऐनवेळी निवडणूक बिनविरोध झाली आणि राजस्थानातील कोटा मतदारसंघातून लोकसभेवर तिसऱ्यांदा निवडून आलेले ओम बिर्ला लोकसभेचे दुसऱ्यांदा अध्यक्ष झाले.

लोकसभा अध्यक्ष म्हणून बिर्ला यांची कारकर्द टीव्हीच्या पडद्यावरून सर्व देशाला गेली पाच वर्षे बघायला मिळाली. बिर्ला हे हसतमुख चेहऱ्याचे व्यक्तिमत्त्व असले, तरी कठोर निर्णय घेताना, ते मुळीच डगमगत नाहीत. नवीन संसद भवनाचे उद्घाटन त्यांच्या अध्यक्षपदाच्या कारकिर्दीत झाले, ही घटना सुर्वणाक्षरांनी संसदेच्या इतिहासात नोंदवली गेली आहे. बिर्ला यांचे अध्यक्षपदासाठी स्वतः पंतप्रधान मोदींनी नाव प्रस्तावित केले व संरक्षण मंत्री राजनाथ सिंग तसेच अमित शहा, नितीन गडकरी, लल्लन सिंग, चिराग पासवान यांनी त्याला अनुमोदन दिले. ओम बिर्ला यांनी कोविड काळात लोकसभा कामकाज व्यवस्थित चालवले, ही त्यांच्या पहिल्या कारकिर्दीची मोठी उल्लेखनीय बाब म्हटली पाहिजे. लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला व राज्यसभा सभापती म्हणजे देशाचे उपराष्ट्रपती जगदीप धनखड हे दोघेही एकाच राज्यातले म्हणजे राजस्थानचे आहेत. यापूर्वी नऊ वर्षे लोकसभा अध्यक्षपदावर राहिलेले बलराम जाखड हेसुद्धा राजस्थानचे; पण ते मूळचे पंजाबचे होते, बिर्ला हे अस्सल राजस्थानचे आहेत. बिर्ला हे संघ-भाजपाच्या मुशीतून तयार झालेले आहेत. १९९० मध्ये कोटा भाजपा जनता युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष होते, १९९१ मध्ये प्रदेशाध्यक्ष झाले, १९९७ मध्ये राष्ट्रीय उपाध्यक्ष झाले. यापूर्वी आणखी दोन जणांना पुन्हा लोकसभा अध्यक्ष होण्याचा मान मिळाला होता; पण ते आपला दुसरा कार्यकाल पूर्ण करू शकले नाहीत. पीए संगमा १९९१, १९९६ व १९९८ मध्ये लोकसभा अध्यक्ष होते. जीएमसी बालयोगी हे १९९८, १९९९, २००२ मध्ये अध्यक्ष होते. दोन महिलांनाही अध्यक्षपदाची संधी मिळाली होती. मीरा कुमार या २००९ ते २०१४ व सुमित्रा महाजन २०१४ ते २०१९ या काळात अध्यक्ष होत्या.

नव्या लोकसभेचे अधिवेशन सुरू झाल्यापासूनच सत्ताधारी भाजपाप्रणीत एनडीए आणि काँग्रेसप्रणीत इंडिया यांच्यात संघर्षाला सुरुवात झाली आहे. लोकसभेचे उपाध्यक्षपद विरोधी पक्षाला देण्यात यावे, आम्ही लोकसभा अध्यक्षपदाची निवडणूक बिनविरोध व्हावी, यासाठी सरकारला पाठिंबा देण्यास तयार आहोत, अशी भूमिका काँग्रेसने भाजपापुढे मांडली. काँग्रेसच्या अटी व शर्ती ऐकून भाजपा आपले सरकार कधीच चालवणार नाही. भाजपाकडे स्वबळावर बहुमत नसले, तरी एनडीएकडे बहुमत आहेच. त्यामुळे केंद्रात सरकारला धोका निर्माण होऊ शकणार नाही. मग काँग्रेसच्या अटी व शर्ती मान्य करून सरकार का चालवावे, असा विचार भाजपा श्रेष्ठींनी केला असावा.

दि. २६ जून रोजी दुपारी ११ वाजता, ओम बिर्ला यांची लोकसभा अध्यक्ष म्हणून बिनविरोध निवड झाल्याची घोषणा झाली आणि भाजपाची दिशा निश्चित आणि कायम आहे. तसेच भाजपाने निवडणूक निकालानंतर आपल्या विचारात आणि मानसिकतेत बदल केलेला नाही, असा स्पष्ट संदेश दिला. लोकसभा अध्यक्षपद हे संसदीय लोकशाहीत अत्यंत प्रतिष्ठेचे समजले जाते. देशाच्या १४० कोटी जनतेच्या भावभावनांचे प्रतिबिंब जिथे पडते, त्या सदनाचे सर्वोच्च पीठासीन अधिकारी हे लोकसभा अध्यक्ष असतात. सत्ताधारी व विरोधी पक्ष या दोन्ही बाजूला न्याय देऊन जनतेच्या आशा-आकांक्षा संसदेत पूर्ण व्हाव्यात, सर्वसामान्य लोकांच्या प्रश्नांकडे सरकारचे लक्ष वेधून, त्यांना न्याय मिळावा, यासाठी अध्यक्ष महत्त्वाची भूमिका पार पाडत असतात म्हणूनच लोकसभा अध्यक्षांची निवड बिनविरोध झाली, तर संपूर्ण देशाला चांगला संदेश जातो. यावर्षी लोकसभा अध्यक्षपदासाठी जर निवडणूक झाली असती, तर देशाच्या इतिहासात ही तिसरी घटना नोंदवली गेली असती. ओम बिर्ला यांना अध्यक्षपदाची पुन्हा संधी देऊन व त्यांची बिनविरोध निवड करून भाजपाने आपले वर्चस्व कायम राखले आहे. तसेच निवडणूक निकालानंतर आपल्या भूमिकेत व विचारसणीत किंचितही बदललेलो नाही, हे दाखवून दिले आहे. काँग्रेसनेसुद्धा अध्यक्षपदासाठी उमेदवार जाहीर केला व विरोधी पक्ष आता कमजोर राहिलेला नाही, असा संदेश दिला. तसेच अध्यक्षांची बिनविरोध निवड करून, आपला होणारा पराभव झाकून ठेवला.

एकसष्ट वर्षं वयाचे भाजपाचे ओम बिर्ला हे कायदा पदवीधर आहेत. कोटामधून तीन वेळा लोकसभेवर व तीन वेळा विधानसभेवरही निवडून आले आहेत. निवडणूक निकालानंतर अठराव्या लोकसभेसाठी अध्यक्ष व उपाध्यक्ष या पदासाठी काँग्रेसने घेतलेल्या भूमिकेमुळे सुरुवातीपासूनच वाद-विवादाला तोंड फुटले. काँग्रेसकडे आणि विरोधी पक्षाकडे मिळून पुरेसे संख्या बळ नसताना, काँग्रेसने लोकसभा अध्यक्षपदासाठी के. सुरेश यांचा उमेदवारी अर्ज का दाखल केला? लोकसभेतील उपाध्यक्षपद हे परंपरेनुसार विरोधी पक्षाला मिळते, असा जो दावा काँग्रेसने केला, त्यात वास्तव किती आहे? अध्यक्ष आणि उपाध्यक्ष या दोन पदांसाठी सत्ताधारी व विरोधी पक्षात रस्सीखेच कशासाठी चालू आहे? सर्व सहमतीने अध्यक्ष व उपाध्यक्ष निवडले पाहिजेत, ही खरी प्रथा आहे. संसदीय लोकशाही पद्धतीला ते पूरक आहे. २०१४ व २०१९ मध्ये केंद्रात स्वबळावर भाजपा सत्तेवर आल्यानंतर सर्वसहमतीने अशी निवड झालेली नाही. २०१४ मध्ये भाजपाने लोकसभा अध्यक्षपद आपल्याकडे ठेवले होते व आपला मित्र पक्ष अण्णा द्रमुकला उपाध्यक्षपद दिले होते. सन २०१९ मध्ये भाजपाने लोकसभा अध्यक्षपद पुन्हा आपल्याकडेच ठेवले; पण उपाध्यक्षपद कुणालाच दिले नाही, पाच वर्षे ते रिक्त ठेवले.

भारतीय संसदीय इतिहासात लोकसभा अध्यक्षपदासाठी यापूर्वी केवळ दोन वेळाच निवडणूक झाली आहे. १९५२ मध्ये पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीनंतर पंडित नेहरू यांनी लोकसभा अध्यक्षपदासाठी जी. व्ही. मावळंकर यांचे नाव सुचवले होते; पण सीपीआयने त्यांच्याविरोधात शंकर शांताराम मोरे यांना उमेदवारी दिली. अर्थातच मावळंकर यांचा विजय झाला. आणीबाणीनंतर लोकसभा अध्यक्षपदासाठी निवडणूक झाल्याची दुसरी घटना घडली. बळीराम भगत विरुद्ध जगन्नाथ राव अशी लढत झाली व भगत विजयी झाले.

अठराव्या लोकसभेसाठी अध्यक्षपद ठरवताना भाजपाने तेलुगू देशम व जनता दल युनायटेड यांच्याशी चर्चा करून निर्णय घेतला होता, असे सांगण्यात येत आहे. त्यामुळे या मुद्द्यावर एनडीएमध्ये वाद नव्हताच. उलट जनता दल(यु) ने लोकसभा अध्यक्ष भाजपाचाच असेल, असे म्हटले होते.

बिर्ला यांची दुसऱ्यांदा लोकसभा अध्यक्षपदी झालेली निवड हा मोदी-शहा यांनी त्यांच्यावर व्यक्त केलेला विश्वास आहे. नव्या सरकारमध्ये भाजपाच्या जुन्या नेत्यांना पुन्हा त्याच खात्यांची जबाबदारी देण्यात आली, तेव्हाच लोकसभा अध्यक्ष बिर्ला होतील, असे संकेत मिळू लागले होते. नवीन व जुन्या संसद भवनात काम केल्याचा अनुभव बिर्ला यांच्याकडे आहे. ही त्यांची मोठी जमेची बाजू आहे.

विशेष म्हणजे १९९९ नंतर लोकसभा अध्यक्ष झालेली एकही व्यक्ती पुन्हा लोकसभेवर निवडून आली नाही किंवा सभागृहात पोहोचली नाही. २०२४ मध्ये बिर्लांनी हा पराक्रम करून दाखवला. ओम बिर्ला खासदारांचा नेहमी 'सन्माननीय सदस्य' असा आदराने उल्लेख करतात. मात्र त्यांच्या पहिल्या कारकिर्दीत डिसेंबर २०२३ मध्ये लोकसभेत घुसलेल्या तरुणांनी जो धिंगाणा घातला, त्यावरून सुरक्षा व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उभे राहिले. संसदेच्या दोन्ही सदनात नंतर जो अभूतपूर्व गोंधळ झाला, त्यात १४६ विरोधी खासदारांचे निलंबन झाले, त्यात सर्वाधिक खासदार काँग्रेस पक्षाचे होते. विरोधी पक्षाशिवाय संसदेचे कामकाज चालवले जाते व महत्त्वाची विधेयके संमत केली जातात म्हणून कामकाज पद्धतीवर टीकेचे वादळ उठले होते. सन २०१९ मध्ये एका तासात वीस प्रश्न चर्चेला घेण्याचा विक्रमही बिर्ला यांच्या पहिल्या कारकिर्दीत नोंदवला गेला.

बिर्ला यांनी अध्यक्षपदावर निवड झाल्यावर केलेल्या भाषणात ५० वर्षांपूर्वी इंदिरा गांधींनी लागू केलेल्या आणीबाणीचा निषेध केला व २५ जून १९७५ हा लोकशाहातील 'काळा दिवस' असा उल्लेख केला. आणीबाणीच्या अचानक झालेल्या निषेधाने काँग्रेसची कोंडी झाल्याचे बघायला मिळाले. लोकसभेत गेली दहा वर्षे विरोधी पक्ष दुर्बल होता, सदनात विरोधी पक्ष नेताच नव्हता. आता लोकसभेत राहुल गांधी हे विरोधी पक्ष नेता आहेत आणि विरोधी बाकांवर २३४ खासदार आहेत. सभागृहाचे कामकाज नियमानुसार समतोल राखत चालविणे, हे ओम बिर्ला यांना मोठे आव्हान आहे. एम. एन. कौल व एस. एल. शकधर लिखित 'प्रॅक्टिस ॲण्ड प्रोसिजर ऑफ पार्लमेंट' या पुस्तकात अध्यक्षांचे महत्त्व व भूमिका सविस्तर विशद केली आहे. हेच पुस्तक म्हणजे संसदीय कामकाज पद्धतीची गीता समजली जाते. त्यानुसार कामकाज चालावे, हेच सर्वांना अपेक्षित आहे.


sukritforyou@gmail.com
sukrit@prahaar.co.in


---

## मराठीवर नितांत प्रेम करणाऱ्या यास्मिन शेख



मायभाषा

डॉ. वीणा सानेकर

आपण जिथे राहतो, जिथे जगतो, वाढतो त्या भूमीत बोलली जाणारी भाषा तीच आपली मातृभाषा असे मानणाऱ्या भाषातज्ज्ञ यास्मिन शेख यांचा वाढदिवस जून महिन्यात असतो. नुकत्याच चिरतरुण यास्मिनबाईंनी वयाच्या शंभराव्या वर्षात प्रवेश केला.

त्यांच्या मराठीप्रेमाचे विलक्षण कौतुक करावे, तितके कमीच आहे. जेरूशा जॉन रुबेन असे बाईंचे मूळ नाव. ज्यू धर्मीयांना द्वेष व तिरस्कारातून खूप सोसावे लागले. आपला देश व भूमी सोडून स्थलांतरित व्हावे लागले. यास्मिनबाईंचे आईवडील पॅलेस्टाईनमधून भारतात स्थलांतरित झाले नि महाराष्ट्रातच वसले. शिक्षणाकरिता मराठी माध्यमच निवडल्या कारणाने मराठीचा वारसा आपसुकच लाभला.

आईवडील उत्तम मराठी बोलणारे नि मुख्य म्हणजे मराठी वाचनाची आवड जपणारे! त्यामुळे घरात भरपूर मराठी पुस्तके स्त्री, सत्यकथा, किर्लोस्कर अशी नानाविध मासिके येत होती. अवती-भवतीच्या या मराठी वाचनसमृद्धीतून बाईंचे मराठीशी दृढ नाते जुळले.

वडील बांधकाम खात्यात असल्याने वाई, पंढरपूर, नाशिक, कराड अशा विविध ठिकाणी त्यांच्या बदल्या झाल्या नि तिथे तिथे मराठी साहित्य संस्कृतीचा ठसा मनावर उमटत राहिला. बी.ए.च्या शेवटच्या वर्षी मराठी या विषयात सर्वोत्तम गुण मिळवून, बाई इतर विषयांच्या विद्यार्थ्यांमध्ये प्रथम आल्या. आजमितीला 'मराठीत गुण मिळत नाहीत' या सुरू असलेल्या प्रचाराची आठवण होते. अन्य विषयांप्रमाणेच मराठी विषयाचा प्रेमाने अभ्यास करणाऱ्यांसाठी गुण देणाराच विषय आहे.

श्री. म. माटे यांच्यासारखे हातचे राखून न ठेवणारे उदार व संवेदनशील शिक्षक यास्मिन बाईंना लाभले. नाशिकच्या कन्या शाळेत नोकरी करत बाईंनी एम. ए.चा अभ्यास केला.

बाई मराठीचे अध्यापन करणार, यावर शिक्कामोर्तबच झाले.

वसंत कानेटकरांचे पदव्युत्तर अभ्यासासाठीचे सहकार्य दिशादर्शक ठरले. कानेटकरांच्या संपर्कातूनच पुरोगामी विचाराच्या डॅडी शेख या मुस्लीम तरुणाशी त्यांचा परिचय झाला. प्रेमातून सुरू झालेला सहजीवनाचा हा प्रवास सुंदर होता. आपल्या दोन्ही मुलींना बाईंनी मराठी माध्यमातच शिकवले.

सायन येथील एस. आई. एस. महाविद्यालयात बाईंनी प्रदीर्घ काळ मराठीचे अध्यापन केले. 'मराठी लेखन मार्गदर्शिका' आणि 'मराठी शब्दलेखनकोश' हे बाईंचे ग्रंथ मौलिक आहेत. व्याकरण हे रुक्ष व नीरस असते हे बाईंना मान्यच नाही. शब्दकोशांच्या जगात त्या सहज रमल्या. जिथे मराठी शब्द उपलब्ध असतात, तिथेही समाज ते वापरत नाही, याची त्यांना खंत वाटते. मराठी प्रदूषित होत आहे, तिची उपेक्षा होत आहे, हे जाणवते, तेव्हा त्या अस्वस्थ होतात. मराठीला अभिजात दर्जा प्राप्त व्हावा म्हणून आपण किती गंभीर आहोत? मराठीबाबतची समाजाची उदासीनता हाच तर तिच्या विकासातला अडसर आहे, ही जाणीव करून देणाऱ्या मराठीप्रेमी यास्मिनबाईंना उदंड शुभेच्छा!



---

# सेरेब्रल पाल्सीग्रस्त मुलांची फुटबॉल प्रशिक्षक गिरिजा



दी लेडी बॉस

अर्चना सोंडे

नागराज मंजुळे दिग्दर्शित 'झुंड' हा चित्रपट दोन वर्षांपूर्वी आला होता. नागपूरमध्ये एक फुटबॉल प्रशिक्षक वस्तीमध्ये राहणाऱ्या मुलांना फुटबॉल शिकवतो आणि त्यांना आंतरराष्ट्रीय स्तरावर खेळण्यास पाठवतो, अशी त्याची कथा होती. अशीच काहीशी कथा तिची आहे, मात्र तिने एका असाध्य रोगाशी लढणाऱ्या मुलांची टीम तयार केली. इतकंच नाही तर या मुलांच्या टीमने 'खेलो इंडिया पॅरा गेम्स-२०२३'सह पाच राष्ट्रीय स्पर्धा जिंकल्या आहेत, तेदेखील अवघ्या पाच वर्षांत. ही गोष्ट आहे, केरळच्या अलाप्पुझा जिल्ह्यातील फुटबॉल प्रशिक्षक गिरिजा कुमारी मधू यांची.

केरळच्या थामरकुलम, अलप्पुझा येथील एका गरीब शेतकरी कुटुंबात गिरिजाचा जन्म झाला. गिरिजाला पाच भाऊ आणि दोन बहिणी. तिचे बालपण सामान्य परिस्थितीत गेले. १९९२ साली तिने १२ वी पूर्ण केली. तिला पुढे शिकायचं होतं; परंतु तिला तिच्या कुटुंबाच्या आर्थिक परिस्थितीचा विचार करावा लागला. त्यामुळे तिने तिच्या आईला आधार देण्यासाठी, कोट्टायममध्ये नर्सिंगचा कोर्स केला. दोन वर्षे रु. ७५० प्रति महिना पगारावर हॉस्पिटलमध्ये तिने काम केले. १९९५ मध्ये तिच्या गावातील एक इलेक्ट्रिकल कॉन्ट्रॅक्टर मधू सूधनन यांच्याशी तिचे लग्न झाले.

मधू आणि गिरिजा यांना दोन मुलगे आहेत. मोठा यदू कृष्णन, २५ वर्षीय बहरीनमध्ये सिव्हिल इंजिनीअर आहे, तर धाकटा २० वर्षांचा गोकुल कृष्णन केरळमध्ये सिव्हिल इंजिनीअरिंगमध्ये बी. टेक शिकत आहे. गोकुलच्या जन्मानंतर मधूने थामरकुलम येथील तिच्या घरी एक छोटा टेलरिंग व्यवसाय सुरू केला. ती डिझायनिंग शिकली. नाईटी, साडी, अंडरस्कर्ट अशी वस्त्रे तयार केली. तीन महिलांना नोकरी दिली. असा १० वर्षे तिने व्यवसाय केला.

गिरिजाला शाळेपासूनच खेळाची आवड होती; पण कौटुंबिक परिस्थितीमुळे ती खेळू शकली नाही. आपण खेळू शकलो नाही; पण मुलाने फुटबॉलपटू व्हावे, यासाठी तिने २०११ मध्ये स्थानिक फुटबॉल अकादमी, चथियारा फुटबॉल अकादमी (CFA) मध्ये तिच्या दुसऱ्या मुलाला दाखल केले. २०१७ पर्यंत, गिरिजा अजूनही तिच्या मुलाच्या फुटबॉल प्रशिक्षणात गुंतलेली होती. जेव्हा अनेक चांगल्या प्रशिक्षकांनी चथियारा फुटबॉल अकादमी सोडले, तेव्हा तिने स्वतः प्रशिक्षक होण्याचा निर्णय घेतला. तिने अलाप्पुझा येथे सहा दिवसांच्या फुटबॉल कोचिंग कोर्समध्ये प्रवेश घेतला. सुरुवातीला ती अपयशी ठरली. त्यानंतर तिने कोचीमध्ये पुन्हा कोर्स केला आणि तिला प्रमाणपत्र मिळाले.

नंतर गिरिजाने २०२१ मध्ये पिल्लई ग्रुप, मुंबईच्या क्रीडा व्यवस्थापनातील फिफा इंडिया एक्झिक्युटिव्ह प्रोग्रामबद्दल ऐकले. तिने मुंबईत त्यांच्या ऑफिसला फोन केला; पण मल्याळम मिश्रित इंग्रजी बोलायला तिला त्रास झाला. सुदैवाने दुसऱ्या बाजूला डॉ. सेलिना जॉय नावाची मल्याळी महिला होती. भेदरलेल्या गिरिजाला त्यांनी शांत केले आणि मल्याळम भाषेत सर्व काही समजावून सांगितले. सेलिनाच्या मदतीने गिरिजाने स्पोर्ट्स मॅनेजमेंट कोर्ससाठी अर्ज केला.





मुलाखतीसाठी तिने इंग्रजी सुधारली. मुलाखतीत तिने तिच्या उत्साहाने प्राध्यापकांना प्रभावित केले आणि एक विशेष बाब म्हणून तिला प्रवेश देण्यात आला. त्यानंतर कोविडचा फटका बसला आणि २०२१ मध्ये हा कोर्स ऑनलाइन झाला. गिरिजाने हा एक वर्षाचा कोर्स पूर्ण केला आणि लवकरच केरळच्या वरिष्ठ मुलींच्या फुटबॉल संघाची संघ व्यवस्थापक बनली.

गिरिजा ऑल इंडिया फुटबॉल असोसिएशन (AIFA)च्या गोल्डन बेबी लीगमध्ये सामील झाली, ही लीग दरवर्षी ५०० ग्रामीण मुलांना फुटबॉलचे प्रशिक्षण देते. तिथे काम करताना तिची कविता सुरेशशी भेट झाली, जी सेरेब्रल पाल्सी स्पोर्ट्स असोसिएशन ऑफ इंडियाचे नेतृत्व करत होती. शरीराची हालचाल आणि स्नायूंच्या समन्वयावर परिणाम करणारा सेरेब्रल पाल्सी (CP) हा एक दुर्धर आजार आहे. समाजाच्या परिघावर ते असतात. त्यांना दुर्लक्षित ठेवले जाते. गिरिजाने तीन वर्षांपूर्वी सेरेब्रल पाल्सी स्पोर्ट्स असोसिएशन ऑफ केरळ (CPSAK) ची स्थापना केली. तिने थामारकुलम या गावात सेरेब्रल पाल्सी मुलांसाठी फुटबॉल उपक्रम आयोजित करण्यास सुरुवात केली.



गिरिजा कुमारी मधू

तिने सेरेब्रल पाल्सी असलेल्या २० मुलांना योग्य प्रशिक्षण आणि आहार मिळावा यासाठी तिचे सोने गहाण ठेवले. पहिल्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी गिरिजाने २ लाख रु. तिचे दागिने गहाण ठेवून जमवले. पुढे अनेक वेळा दागिने गहाण ठेवावे लागले. असोसिएशनमध्ये सामील होण्यापूर्वी गिरिजाने सेरेब्रल पाल्सीग्रस्त मुलांबद्दल खूप संशोधन केले आणि त्यांचा संघर्ष समजून घेण्यासाठी त्यांच्या कुटुंबीयांना देखील भेटली.

२०२१ पासून गिरिजाने सुमारे २५० सेरेब्रल पाल्सीग्रस्त मुलांना प्रशिक्षित केले आहे आणि खेलो इंडिया पॅरा गेम्स २०२३ सह आम्ही सहभागी झालेल्या सर्व पाच राष्ट्रीय स्पर्धा जिंकल्या आहेत.

या मुलांसाठी फिटनेस प्रशिक्षण लवकर सुरू करण्यासाठी, ती पालकांना प्रोत्साहित करते. कोचिंगच्या आव्हानांबद्दल स्पष्टीकरण देताना गिरिजा म्हणते, ''समाज अनेकदा या मुलांकडे दुर्लक्ष करतो किंवा त्यांची थट्टा करतो आणि त्यांचे पालक त्यांच्या भविष्याबद्दल घाबरतात. आम्ही या मुलांना सामान्य मुलांप्रमाणे प्रशिक्षण देतो; पण ते कठीण आहे. या मुलांची नोंदणी करण्यास इच्छुक पालकांना शोधणे कठीण आहे म्हणून आम्ही टॅलेंट हंट स्पर्धा घेतो. सुदैवाने आता लोकांना आमच्याबद्दल माहिती आहे आणि थेट संपर्क साधला जातो.''

२०२३ मध्ये, गिरिजाने अमोघा फाऊंडेशनची सुरुवात मेव्हण्याच्या मदतीने कौशल्यवान अपंग मुलांसाठी आणि आर्थिकदृष्ट्या कमकुवत पार्श्वभूमीतील मुलांसाठी केली. त्यांनी १५ मुलांना स्कूटर आणि लॅपटॉप देऊन आणि त्यांच्या कौशल्य विकासासाठी मदत केली आहे. एचडीएफसी बँकेची ऊर्जा फाऊंडेशन गिरीजाचे कार्य लक्षात घेऊन अमोघाच्या सेरेब्रल पाल्सीग्रस्त मुलांना आणि स्त्रियांना मदत करते, ग्राफिक डिझाइनसारख्या कौशल्यांमध्ये वर्षभर प्रशिक्षण देते आणि त्यांना स्वतंत्र भविष्यासाठी नोकरी सुरक्षित करण्यात मदत करते.

एका स्त्रीने निर्धार केला, तर ती समाजात किती बदल घडवून आणू शकते, हे गिरिजाच्या कार्यातून कळते. दुर्धर आजाराशी झुंजणाऱ्या मुलांना राष्ट्रीय स्तरावरील फुटबॉल स्पर्धा जिंकून देणारी गिरिजा कुमारी मधू खरी लेडी बॉस आहे.


theladybosspower@gmail.com


---

# मी स्वत:ला शोधताना



मोरपीस

पूजा काळे

तुझ्या माझ्यातला 'मी'चा प्रवास म्हणजे सुख-दुःखातल्या वाटेवरचा विलक्षण ध्यास. वलयांकित अशा खाच-खळग्यातल्या या प्रवासात, जरी पडले, तरी उठून उभं राहण्याचा अगम्य, इच्छाशक्तीचा सहवास. आपल्या परीनं जगण्याला नवा अर्थ देणारा अहोरात्र वनवास.

तुझं, माझं असणं म्हणजे स्वतःचा स्वतःनेचं घेतलेला अवघा शोध. मी स्वतःला शोधताना, अंती एकची उरते. भाववेड्या स्वप्नासंगे, राती एकली निजते. हे एकाकीपण असं रातीलाचं का बरं यावं? अशातचं या घनघोर, काळभोर रातीला जागं करून, बैचेन करण्याइतपतं या स्वप्नांना चैन पडत नसावं. म्हणूनचं मनावर स्वार होत ही स्वप्न रात्रीला त्यायोगे माझ्यातल्या 'मी'ला हैराण करतात. मग 'मी' अशी चाचपडत उठते. हे सत्य की स्वप्न, कळेस्तोवर उजाडलेलं असतं भकास. नदीच्या प्रवाहाला धार लागते. पाणी अधिक खळखळतं. शीतल झुळकीवर स्वार होत वारा झाडांशी सलगी करतो. सोळावं वरीस असल्याच्या आवेगानं हसरा पारीजात मृत्तिका रंगात सरमिसळून घोळवून घेतो स्वतःला. दूरवर पक्षांचा किलबिलाट, मोराचा केकारव, कोकिळेची कुहूकुहू बोली सर्वार्थानं अंगावर रोमांच उभं करायला आणि काय काय हवं असत? निसर्गाच्या सानिध्यात रमणाऱ्या देहाला उण्याची दुनिया सतावत नसली, तरी रात्रीच्या एकांतातलं बेभरवशासारखं जगणं, क्लेषदायक असतं. काळोख्या रात्री झोपेला चाळवून स्वतःला हवी तशी फुलविण्याची आस धरणारी स्वप्न जागी करतात. महत्त्वाकांक्षा राक्षसी असू शकतात एखादवेळी; पण स्वप्न राक्षसी नसतात. स्वप्न खरी-खुरी, शांत-अल्लड, वेल्हाळ-खोडकर असतात. भाकरीसोबत स्वप्नं या दोन गोष्टींची परीपूर्तता यावर अवलंबून असलेली माणसं आहोत आपण. तेव्हा मनासारखं घडलं की, स्वप्नील दुनियेत भटकंती करतो स्वच्छंदपणे. हा अनुभव वारंवार घेत असताना, मऊशार जांबूनी, गुलाबी रजईतला झोपेचा अंमल डोळ्यावर असतो. मनाच्या नकळत उसवलेला धागा सलतो कुठ तरी. मी लगबगीनं उठते, पाण्याचा भपकारा मारते तोंडावर. तांबडं फुटावयास अवधी असतो एव्हाना. रीतसर जुन्या-नव्या गाण्यांचा अल्बम काढते. पसाभर भिजलेला मनातला पाऊस गपगार असतो. सरींवर सरी कोसळत असतात अंगणात. सूर छेदणाऱ्या रागीणी आशा, लता बेसूर वाटू लागतात. थोडं वेगळं म्हणून सुरेशजींचे गाणं आठवतं. सूर भिडताचं रममाण होते मी. "पाहिले न मी तुला तू मला न पाहिले, ना कळे कधी कुठे मन वेडे गुंतले." मनाचिया गुंती वाहत जाते. या अवस्थेपर्यंत कोलमडलेलं मन, भंगलेली स्वप्नं यांचा मेळ साधताना, शोधते मी मला स्वतःला. यावेळचे प्रश्न सुटणारे नसतात. अधिक जटिल होत जाणारे असतात. हा प्रवास कुठे संपणार कुणास ठाऊक? तरीही नशिबाला दोष न देता, आनंदाने स्वीकारते त्याला. कुठल्या मक्तेदारीला बळी पडण्याइतपत दुबळी नाहीय मी. स्त्री मन हळवं असलं, तरी लढण्याचं सामर्थ्य अंगी असतचं तिच्या.



तुम्हालाही माझ्याप्रमाणं कोणे एके काळी प्रेमाच्या अत्युच्च शिखरानं मोहवलं असेलच की! असं काय होत त्याच्यात; जे आवडलं होत मला. आज माझं मलाचं हसू येत. निर्लेप मनाच्या गाभाऱ्यातलं प्रेम जे कधी फुललं नाही. बहरलं नाही. प्रेमाच्या पल्याड दिसू लागल्यावर, प्रेमाशी संबंधित कैक विषयाला फाटे फुटावेत, तसे फुटले फाटे निवडुंगासम. कडेलोट झाला प्रेमात. शेवट शून्याशी आला. पडले एकटी जेव्हा तेव्हा होती शिदोरी अनुभवांची. मग काय सज्ज झाले, लढायला सगळ्या सामर्थ्यानिशी. दिस नकळत जाई, गीत गात असे कोणी. वरपांगी दुःख माझे, आळवते ग् विराणी. मनावर लिंपण चढले. मी स्वतःला शोधताना, पाण्यात रंगले. रामनामे श्रीहरींच्या, भाव दर्शनात दंगले. एकदा का स्वतःला ओळखण्यात तुम्ही पारंगत झालात की, या 'मी'चं अस्तित्व खुलतं. त्यावेळी द्वैत-अद्वैताच्या भेटी पारलौकिक ठरत नाहीत. लौकिकत्व मिळविलेला चैतन्यरूपी आरसा तो. इथं तर मी आहे सर्वस्व. माझे मजला आहे भान. एकतारी धून वाजे, मीरा गाई कृष्ण गान. मीरा ही मीचं आहे. आयुष्याला सामोरं जाताना आलेल भान ही मीचं आहे. संकट धडे देतात आणि त्यातून उलगडते रहस्यमय जीवनसार. वीण घट्ट होते. सिद्धता येते. आत्मभान ते स्वयंसिद्धा हा खडतर प्रवास खऱ्या अर्थानं जगताना, आपणचं आपल्याशी केलेला वैचारिक, मानसिक करार जो विशिष्ट इप्सित साध्य करतो. त्यातून जी उभी राहते, ती रणरागिणी होय. आता योग्य दिशेनं पावलं चालू लागतात. हरी सावळ्याच्या दर्शनाला धावतात. कधी गरीबाचे हात होतात. कधी संत वचनाला जागतात. तर कधी कृपावंत दाता होतात. या सगळ्यात तावून सुलाखून माझं, मी पण घडलेलं असतं. रातराणी अबोल मी, कळीचा मोगरा मी. आसमंती भरुनी उरावे, निशिगंधित परिमळ मी. रोज पहावे त्यात मजला आरशाहून सुंदर मी. गुंतूनी गुंत्यात माझ्या, सोडवावे प्रश्न मी. असेन मी नसेन मी, परी जगा कळेन मी. मागे स्वकर्तृत्वाच्या पाऊलखुणा ठेवेन मी. ध्येय गवसतं, हाती उरतं अंतिम सत्य. जे चेहऱ्यात स्थिरावतं, माधुर्यात सामावतं. त्याहूनही मनाचा मोठेपणा, हृदयाची सर्जनशीलता यानं देहरूपी भांड भरून ओसंडून वाहतं. त्याचं क्षणी माझी मी स्वतंत्र होते, उडते, पंख पसरवते, भरारी घेते अवकाशात. हेच ते ठिकाण, जिथं आशावादी वळणवाट गवसलीय माझी मजला. इथं माझ्यातल्या मी तत्त्वाचा शोध संपलेला असतो. मी निर्भया शांत चित्ताने मार्गस्थ होते, अंतिम ध्येय गाठण्यासाठी. अंतिम ध्येय गाठण्यासाठी...

# भावंडांतील भांडणं

मुलं लहानपणी आपल्या भावा-बहिणींशी कितीही वेड्यासारखी भांडली, तरी ते छान मित्र असतात. स्पर्धा असली तरी प्रेम असतं. मारामारी आपापसात करतील; पण दुसऱ्याने एक शब्द जरी भावंडाला बोलला, तर खपवून घेणार नाहीत. जशा झाडाच्या फांद्या वेगवेगळ्या वाढत असल्या तरी त्याचे मूळ एकच असतं, तसंच भावडांचं असतं. ती आपापसात कधी तार स्वरात, तर कधी खर्जात भांडत असली, तरी एकत्र आली की, एक सुमधुर संगीत ऐकू येत राहतं. भावासारखा दुसरा मित्र किंवा बहीण असली तर मैत्रिणीची गरज उरत नाही.

**मुलांमध्ये सामाजिक कौशल्यांची जर उणीव, कमतरता, न्यायाने वागलं पाहिजे ही जर जाणीवच तयार झाली नसेल, तर भांडणांचं प्रमाण आणि तीव्रता वाढत जाते. आपल्या मुलांबाबत फेव्हरिटिझम नको, अतिसहकार्यही नको. म्हणजे मुलं स्वतःहून मार्ग काढायला, विचार करायला लागतात.**



प्रत्येक पालकांचेही असं स्वप्न असतं की, मुलांना वाढवताना दोन भावंडं एकमेकांबरोबर खेळणी, कपडे शेअर करतात. एकमेकांची काळजी घेतात, एकमेकांना सांभाळत आहेत. प्रेम वाढतंय, भावंडं एक दुसऱ्याला सोडून काही खात नाहीत, एकाला लागलं तर दुसऱ्याला त्रास होतो. दोघांचे सारखेच कपडे आहेत. मैदानावर आपल्या भावाला, बहिणीला कोणी बुली केलं, तर आपल्या भावंडाना दुसरा वाचवतो. ढाल बनून उभा ठाकतो.

पण प्रत्यक्षात हे स्वप्न भंग पावतं. कधी कधी जेव्हा त्यांची भांडणं आई-वडिलांना त्रासदायक होतात. जिथे एका घरात भाऊ-बहीण असतात, तिथे शारीरिक मारामाऱ्या जरा कमी असतात; पण दोन मुलगे असले, तर याचं प्रमाण जास्त असू शकतं. एक तर ही दोन मुलं पूर्णपणे दोन वेगळ्या पर्सनॅलिटीची असतात. त्यांचा स्वभाव, पिंडही निराळा असतो. एक प्रकारची स्पर्धा असू शकते त्यांच्यात. एक असूया, नाराजी असते. भांडणं होतात.



**आनंदी पालकत्व**
**डॉ. स्वाती गानू**

कधी कधी तर खूप जोरदार, टोकाची. आता या नात्यात शांतता कशी निर्माण करायची, हा प्रश्न पालकांना सतावत असतो. काय कारणं असतील दोन भावंडांत मत्सर असण्याची, हे जाणून घ्यायला हवी. सख्ख्या भावंडात, सावत्र भावंडात, चुलत, मावस, मामे भावंडातही ही मत्सर भावना असू शकते. ती शाब्दिक भांडणं, वादविवाद असतात. नावाने चिडवणं, फालतू, छोट्या छोट्या गोष्टींवरून वाद घालणं, एकमेकांबद्दल मत्सर जाणवेल अशी भाषा वापरणं. हे ऐकलं की, आई-वडिलांना काळजी वाटते; पण मुलांचे वाद, त्यांची भांडणं अगदी नॉर्मल आहेत. बहुतेक पालकांना या गोष्टीला सामोरं जावं लागतं.

**भावंडांतील भांडणांची कारणं तरी काय असतात?**

मुलांसाठी भावंडं हा पहिला पीअर ग्रुप असतो. भावंडांबरोबर जुळवून घेणं, शेअर करणं, वाद मॅनेज करणं, संवाद करणं ही अतिशय गुंतागुंतीची कौशल्ये मुलं या संबंधातून शिकत असतात. पण या सामाजिक कौशल्यांची जर उणीव किंवा कमतरता असेल तर किंवा आपण भावंडांनी न्यायाने वागलं पाहिजे ही जाणीवच तयार झाली नसेल, तर भांडणांचं प्रमाण आणि तीव्रता वाढत जाते. मानसशास्त्र सांगतं की, मुलांचा घरातील जन्मक्रम, फॅमिली डायनॅमिक्स यावरही भावंडांतील भांडणांची कारणं ठरतात. पहिल्या मुलाचे खूप लाड होतात. जास्त कौतुक होतं. त्याला खूप अटेन्शन मिळतं, पहिलं मूल सगळ्यांचं खूप लाडकं असतं. जेव्हा भावंडं चोवीस तास एकत्र असतात, तेव्हा कुठल्या ना कुठल्या शुल्लक कारणावरून भांडणं होऊ शकतात. ते पूर्णपणे प्रगल्भ नसतात, त्यांचा वैचारिक विकास झालेला नसतो.

अशा मुलांशी तुम्हाला डील करायचं असतं. मुलं आपल्या मनातील निराशा, काळजी हे सारं काढण्यासाठी सहज उपलब्ध असणाऱ्या लहान भावंडांना टार्गेट करत असतात.

लहान भावंडांना येता-जाता टपली मारणं, कधी फटका मारणं, कारण ते बिचारे लहान असतात हेही चालतं. जर दोघांत चार वर्षांच्या पेक्षा कमी अंतर असेल किंवा कमी अंतर, जास्त अंतर असले तरी ही भांडणं असतातच. मत्सर तुमच्या एका मुलाने शाळेत खेळात पहिलं बक्षीस मिळवलं. तुम्ही त्याचं कौतुक केलंत आणि ते पाहून तुमच्या मोठ्या मुलाने छोट्याला मिळालेलं गिफ्ट, सर्टिफिकेट फाडून टाकेन असं छोट्याला धमकावेल. हा असतो मत्सर भावंडांतील.

**इंडिव्हिज्युअलिटी**

लहान मुलांमध्ये हे जन्मतःच असतं की, ते इंडिव्हिज्युअल असतात. विशेषतः त्यांच्या भावंडांपेक्षा वेगळे, स्वतंत्र असतात. कोण जास्त पुढे जातं, यश मिळवतं ही स्पर्धा असते. कोण सायकल वेगाने चालवतं, कोण जास्त खाऊ शकतं असंही असतं. हे सारं आपल्याला पटत नाही; पण भावडांना आपलं अस्तित्व सिद्ध करण्यासाठी हे खूप महत्त्वाचं आणि आवश्यक वाटतं. मुलांनी जर तुम्हाला दोघांना सतत ओरडून व आक्रमकपणे भांडताना पाहिलं असेल, तर तेही तुमचं बघून तसंच भांडायला शिकतील. भांडणं करणं त्यांना कळेल, पण भांडणं सोडवणं त्यांना जमणार नाही. कारण ते त्यांनी पाहिलंही नाही की, ते शिकलेही नाहीत.

घरात जर एक भावंडं आजारी, विशेष गरजा असणारे असल्याने त्याच्याकडे अधिक लक्ष दिले जात असेल, स्पेशल वागणूक मिळत असेल किंवा त्याने कसंही वागलं तरी त्याचं कौतुकच केलं जात असेल, तर दुसरं मूल मग भांडणाच्या पावित्र्यात राहतं.

मुलं अशी भांडत राहिली की, आपण स्वतःला दोष देतो, पण यात तुमची काही चूक नसते. आपण त्यात पुढाकार घेतो. भांडणं सोडवण्याचा प्रयत्न करतो. मात्र एकाची बाजू घेतली तर दुसऱ्याला राग येतो.

- सतत एकाचं कौतुक आणि दुसऱ्याला दोषी ठरवू नका. त्याच्यावर टीका करू नका. त्यांच्या वैशिष्ट्यपूर्ण गुणांचं कौतुक करा. जसं राधा उत्तम जिम्नॅस्टिक्स करते, अर्णव तबला अप्रतिम वाजवतो.
- मुलांच्या गरजा आणि आवडीनिवडींकडे विशेष लक्ष द्या. पण शक्यतो मुलांची भांडणं त्यांना सोडवू द्या. तुम्ही त्यात जरा कमी हस्तक्षेप करा. नाही तर भांडण कसं सोडवायचं असतं, हे मुलं कधी शिकणार नाहीत.
- जर जास्तच भांडण वाढू लागलं, तर दोघांना वेगळं करा. शांत झाल्यावर समजावून सांगा की, तुम्ही दोघंही कुटुंबाचा महत्त्वाचा भाग आहात.
- मोठ्या भावंडाकडे पर्सनल लक्ष द्या, कारण आपण नेहमीच मोठ्याला डावलतो आणि लहान मुलाला झुकतं माप देतो.
- मुलं खेळण्याऐवजी भांडणातच वेळ वाया घालवत असतील, तर त्यांना सांगा की, लवकरच तुमचा 'प्ले टाईम' संपतोय. खेळायचं की भांडायचं, ते तुम्हीच ठरवा.

जर अर्धा तास भांडला नाहीत, तर आवडता शो लावण्यात येईल. असं सांगता येईल. खेळाचा वेळ वाढवून मिळेल.

**'या' चुका करू नका**

- जर तुम्ही भांडणाची सिच्युएशन पाहिली नसेल, तर कोणाची बाजू घेऊ नका.
- छोटे छोटे सोल्युशन्स, उपाय सांगा. जे दोघांनाही उपयोगी ठरतील. कधी तडजोड करायला लावा.
- दोघांनाही सारखीच जागा मिळू दे, त्यांच्या रुममध्ये.
- मुलांची भांडणं होत असताना, आपण खरंच रेफ्रीची भूमिका पार पाडत असतो. अशा प्रसंगात आपण कधी ओव्हरव्हेल्म होतो, कधी निराश वाटतं पण शांत राहायचंय. स्वतःवर नियंत्रण ठेवायचं. मुलं काय पाहतात की, तुम्ही भांडणाच्या वेळी दोन्ही भावंडांशी कसे बोलता, वागता, प्रतिसाद देता तशी पुढची स्ट्रॅटेजी मुलं ठरवतात.

मुलांबाबत फेव्हरिटिझम नको, अतिसहकार्यही नको. म्हणजे मुलं स्वतःहून मार्ग काढायला किंवा कमी भांडून प्रश्न सोडवता येईल का? याचा विचार करायला लागतील.

# 'तुम रहे ना तुम...'



'कागज के फुल' हा १९५९ साली आलेला, भारतातला पहिला सिनेमास्कोप चित्रपट होता आणि तो दिग्दर्शित करणाऱ्या गुरुदत्तची मात्र ती शेवटची कलाकृती ठरली! खरे तर 'तुझ्या आयुष्याशी इतके साधर्म्य असलेली कथा घेऊन सिनेमा काढू नकोस' असे सचिनदेव बर्मन यांनी त्याला बजावले होते. इतकेच नाही तर जर 'असे केलेस तर मी पुन्हा तुझ्यासाठी संगीत देणार नाही' अशी तंबीही दिली होती.

सिनेमात गुरुदत्तची नायिका होती-वहिदा रहमान. याशिवाय जॉनी वॉकर, वीणा, बेबी नाझ, मेहमूद, मोहन चोटी, टूनटून हेही लोकप्रिय कलावंत होते. एक यशस्वी सिनेदिग्दर्शक (सुरेश सिन्हा) व्यक्तिगत जीवनात मात्र दुःखी असतो. त्याच्या पत्नीच्या घरच्यांना सिनेमा क्षेत्र हे मुळातच एक प्रतिष्ठित व्यवसाय वाटत नसल्याने, दोघांत अंतर पडते. इतके की त्याला स्वतःच्या मुलीलाही भेटू दिले जात नाही.

एका पावसाळी रात्री योगायोगाने त्याची भेट शांतीशी होते. तिला भिजलेली आणि आजारी पाहून तो तिला पावसापासून वाचण्यासाठी आपला कोट देतो. दुसऱ्या दिवशी नोकरी शोधण्यासाठी म्हणून मुंबईत आलेली शांती कोट परत करण्यासाठी शूटिंग सुरू असतानाच चुकून त्याच्या सेटवर येते. तिथे आपोआप झालेल्या तिच्या चित्रीकरणात त्याला तिच्यात अभिनय गुण जाणवतात. त्यामुळे तो तिला सिनेमात घेतो आणि नकळत त्यांची प्रेमकहाणी सुरू होते. त्यांच्यातील संबंधांची चर्चा शेवटी त्याच्या मुलीपर्यंत पोहोचते. तिला आपल्या आई-वडिलांत अंतर पडायला नको असते. म्हणून ती शांतीला भेटून 'कृपाकरून वडिलांच्या जीवनातून निघून जा' अशी विनंती करते. त्यावर वहिदा सर्व विसरून गुरुदत्तला सोडून निघून जाते. कोर्टात सुरेशच्या घटस्फोटाला मान्यता मिळून त्याला पत्नी आणि मुलीलाही मुकावे लागते. त्यातून तो व्यसनाधीन होतो. त्याची यशस्वी कारकीर्द संपुष्टात येते. शेवटी व्यसनाधीनतेमुळे खंगलेला सुरेश ज्या स्टुडिओत प्रचंड यश पाहिले, राज्य केले, तिथेच दिग्दर्शकाच्या खुर्चीत बसून मरण पावतो, अशी ही शोकांतिका.

यावेळी गुरुदत्तचे लग्न गायिका गीता रॉयचौधरीशी (नंतरची गीता दत्त) झालेले होते. त्याच्या आणि वहिदा रहमानच्या रोमांसबद्दल सिनेसृष्टीत कुजबुज होतीच. त्यामुळे सिनेमा त्याच्याच कथेवर आधारित होता, अशी चर्चा झाली. काहींच्या मते, ती 'किस्मत'चे दिग्दर्शक ज्ञान मुखर्जी यांना गुरुदत्तने वाहिलेली आदरांजली होती. शेवटी सचिनदांचे शब्द खरे ठरले आणि सिनेमा साफ कोसळला. समीक्षकांनी आणि प्रेक्षक या दोघांनाही सिनेमा आवडला नाही. गंमत अशी की, आज तोच चित्रपट देश-विदेशातल्या चित्रपटनिर्मिती शिकवणाऱ्या कॉलेजातील पाठ्यक्रमाचा भाग बनला आहे. 'युनिव्हार्सिटी ऑफ आयोवा'ने तर एका प्रकाशनात म्हटले होते, 'काही दोष सोडले तर 'कागज के फुल'चा दर्जा जगप्रसिद्ध इटालियन सिनेदिग्दर्शक फेडरीको फेलिनीच्या सिनेमांइतकाच आहे.'

'कागज'ची गणती 'ब्रिटिश फिल्म इन्स्टिट्यूटने' प्रसिद्ध केलेल्या २००२ सालच्या 'सर्वोत्कृष्ट २० भारतीय चित्रपटांच्या यादीत' ११व्या क्रमांकावर झाली. 'साईट अ‍ॅण्ड साऊंडच्या' समीक्षकांनी आणि दिग्दर्शकांनी केलेल्या सर्वेक्षणात त्याला आजवरच्या भारतीय चित्रपटात १६०वा क्रमांक मिळाला. 'एनडीटीव्ही'ने त्याची गणना भारताच्या सर्वोत्कृष्ट २० सिनेमांत केली. 'आऊटलुक' मासिकाने २००३ साली घेतलेल्या जनमत पाहणीत पहिल्या सर्वोत्तम २५ सिनेमांत 'कागज के फुल'ला लोकांनी सहावा क्रमांक दिला. चित्रपटासाठी व्ही. के. मूर्थी यांना सिनेमॅटोग्राफीबद्दल फिल्मफेअर मिळाले आणि एम. आर. आचरेकर यांना सर्वोत्कृष्ट कलादिग्दर्शनाचे फिल्मफेयर.

कागज के फुलमधील कैफी आझमी यांची दोन गाणी अविस्मरणीय होती. 'बिछाडे सभी बारी बारी'मध्ये सिनेक्षेत्रातील वास्तव सांगितले आहे. यश असताना लोक कसे डोक्यावर घेतात आणि एखाद्या वेळी अपयश आले, तर लोक ओळखसुद्धा न दाखवता, कसे निघून जातात, ते चित्रित केले होते. तेही सिनेमा आंतरराष्ट्रीय पातळीवर नावाजला जाण्याचे एक कारण होते. सिनेरसिकात 'वक्तने किया क्या हंसी सितम' आजही लोकप्रिय आहे. कैफी आझमी यांनी या गाण्यात प्रेमातील एक अगदी वेगळी परिस्थिती चित्रित केली होती.



**नॉस्टॅल्जिया**
**श्रीनिवास बेलसरे**

वहिदाच्या मनात गुरूदत्तबद्दल प्रेम अंकुरले आहे. ती त्याच्यासाठी स्वेटर विणत बसली आहे. त्यालाही तिचे प्रेम हवेसे वाटते, मात्र आपण विवाहित आहोत, आपल्याला एक मुलगी आहे, ही गोष्ट वहिदाला माहीत नाही, आपण ती तिला सांगायला हवी, असे त्याला वाटते. मनाचा अगदी निर्मळ असलेला तो तिला सत्य सांगतो. त्यावर ती म्हणते 'मला सर्व माहीत आहे' आणि तिच्या चेहऱ्यावर निरपेक्ष प्रेमाचे एक अलौकिक स्मितहास्य उमटते. त्याचवेळी पार्श्वभूमीवर हे गाणे ऐकू येते-

'वक्तने किया क्या हंसी सितम,
तुम रहे ना तुम, हम रहे ना हम.'

खरेच असे होते. प्रेमिक प्रेमात असताना, स्वतःचे व्यक्तिमत्त्व जीवलग व्यक्तीत जणू विसर्जितच करून टाकतात आणि अनेक बाबतीत एकमेकांसारखे होऊन बसतात. आधीचे एकटेपण जीवलगाच्या भेटीमुळे कुठल्या कुठे पळून जाते. सहजच भेटूनही आपण इतके एकरूप झालो की, जणू कधी वेगळे नव्हतोच, असेच दोघांना वाटू लागते.

*'बेकरार दिल इस तरह मिले,*
*जिस तरह कभी, हम जुदा न थे.*
*तुम भी खो गये, हम भी खो गये,*
*एक राहपर, चलके दो कदम.'*

मात्र नियतीच्या अनामिक भीतीमुळे एक अविवाहित स्त्री आणि विवाहित, मुलगी असलेला पुरुष पुढे काय करणार याचे कोडे दोघांनाही उलगडत नाही. सहवासातून निर्माण झालेले निरागस प्रेम आणि समाजातील रीतीरिवाजांची बूज ठेवण्याची प्रांजळ इच्छा यात त्यांचा गोंधळ उडाला आहे, तरीही प्रत्येक क्षण मनात फुलणारे प्रेम प्रत्येक श्वासाबरोबर त्यांना सहजीवनाची अनेक स्वप्न दाखवत राहते.

*जायेंगे कहा, सूझता नहीं,*
*चल पड़े मगर रास्ता नहीं.*
*क्या तलाश हैं, कुछ पता नहीं,*
*बुन रहे हैं दिन ख्वाब दम-ब-दम.'*

गीता दत्तच्या आवाजातल्या या गाण्याला संगीत होते-सचिनदांचे आणि गीतकार होते-कैफी आझमी. गुरुदत्त, वहिदा रहमान, कैफी आझमी, सचिन देव बर्मन अशी दिग्गज नावे आणि अब्रार अल्वी यांचे अभिजात संवादलेखन एकत्र येऊनही सिनेमा पडला. मात्र जबरदस्त अभिनय




आणि उत्तम दिग्दर्शनामुळे 'कागज के फुल'नंतर सिनेनिर्मिती शिक्षणाच्या पाठ्यक्रमातील एक भाग बनला. तो हिंदी भाषा समजणाऱ्या कोणत्याही संवेदनशील मनाला दिलासा देताना अस्वस्थ करणाऱ्या आणि अस्वस्थ असताना दिलासा देणाऱ्या गाण्यांमुळे रसिकांच्या कायमच स्मरणात राहणार, हे मात्र खरे!

सिनेमात जेव्हा सर्व संपते आणि सुरेश सिंहाची मुलगी त्याचा पत्ता विचारायला वहिदाकडे येते, तेव्हा तिला एका वेदनादायी प्रसंगातून जावे लागते. गुरुदत्त बेघर, निराश्रित झाल्याने तिच्याकडे त्याचा पत्ता नसतो. पम्मिला नेमका तोच हवा असतो. त्यावेळचा वहिदाचा संवाद अस्वस्थ आपल्याला अस्वस्थ करतो-

*"दिन आते हैं, जाते हैं, याद नही रहते.*
*पिछली यादोके सिवा अब तो*
*कुछ भी याद नही रहता."*

अशी ही गाणी ऐकताना आपलेही तसेच होते ना? अलीकडे जुन्या काळच्या आठवणीशिवाय काहीही लक्षातच राहत नाही.

# हव्या हव्याचा हव्यास...

जगप्रसिद्ध रशिअन लेखक लिओ टॉलस्टॉयने लिहिलेली एक कथा आहे.

हाऊ मज लँड अ मॅन नीड्स?

मराठीत या कथेची अनेक भाषांतरं, रूपांतरं झाली आहेत. एक अत्यंत दरिद्री माणूस राजाच्या दरबारात गेला आणि त्याने राजाजवळ थोडी जमीन मागितली.

राजा म्हणाला, 'उद्या सकाळी ये. सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत जेवढं अंतर चालशील तेवढी जमीन तुझ्या मालकीची. अट फक्त एकच. वर्तुळ पूर्ण व्हायला हवं. सकाळी जिथून चालायला सुरुवात करशील त्या ठिकाणी संध्याकाळी सूर्यास्ताच्या आत परतायला हवं.'

दुसरे दिवशी तो दरिद्री माणूस सूर्योदयाच्या आधीच हजर झाला. सूर्योदय झाला आणि त्या माणसाने चालायला, नव्हे धावायला सुरुवात केली. धावता धावता तो बराच दूर गेला. सकाळची कोवळी उन्हं आता माथ्यावर आली. त्या माणसाच्या अंगातून घामाच्या धारा निथळू लागल्या. पोटात भुकेचा आगडोंब उसळला. जरासं थांबावं, भाकरतुकडा खाऊन घोटभर पाणी प्यावं, घटकाभर विश्रांती घ्यावी असा विचार त्याच्या मनात क्षणभर चमकला. पण...!

पण पुढच्याच क्षणी त्याने तो विचार झटकून टाकला अन् आणखीनच जोराने धावायला सुरुवात केली. प्रत्येकक्षण महत्त्वाचा होता. जेवढे जास्त धावू तेवढी अधिक जमीन मिळणार होती. तो माणूस धावतच राहिला. पुढे... पुढे... आणि अचानक त्याच्या ध्यानात आलं की, त्याची सावली लांब झालीये. माथ्यावरचा सूर्य पश्चिमेला कललाय. आता माघारी फिरायला हवं. फिरून राजवाड्याजवळ पोहचून वर्तुळ पूर्ण करायला हवं. तो माघारी वळला आणि जीवाच्या आकांतानं राजवाड्याच्या दिशेने धावायला सुरुवात केली. पण आता पायातलं त्राण संपले होते. श्वास धपापू लागला होता. घसा कोरडा पडत चालला होता. राजवाडा तर फारच दूर राहिला होता. आणि अचानक त्याला चक्कर आली. छाती फुटून रक्ताची उलटी झाली. तो माणूस खाली कोसळला. पडला. मेला...!

ज्यावेळी त्या माणसाचं प्रेत पुरण्यासाठी खड्डा खणला त्यावेळी राजा म्हणाला, 'कितीशी जमीन लागते माणसाला? सहा फूट लांब आणि तीन फूट रुंद. बस्स शेवटी एवढ्याच जमिनीची आवश्यकता असते.' लिओ टॉलस्टॉय या जगप्रसिद्ध रशिअन लेखकाची ही गोष्ट, हाऊ मज लँड अ मॅन नीड्स? ही गोष्ट तुम्ही नक्की ऐकली वाचली असेल.

आज ही गोष्ट मला पुन्हा नव्यानं आठवली कारण... गेल्या आठवड्यात माझ्या ओळखीतलं एक जोडपं आमच्या घरी आलं होतं. नवरा एका मोठ्या कंपनीत डायरेक्टर. बायको एका फॉरिन बँकेत व्हाइस प्रेसिडेंटच्या हुद्यावर. दोघांचा मिळून पगार साधारण महिन्याला पंचवीस तीस लाख रुपये. घरात सगळ्या प्रकारच्या सोयीसुविधा. पण एवढा पैसा असूनही त्या जोडप्याला मूल-बाळ नाहीये. नवरा-बायको दोघंही करिअर माईंडेड आहेत. दोघेही आपापल्या कामात सतत व्यग्र...!

लग्नानंतर सुरुवातीला पहिली पाच वर्षं सेटल होईपर्यंत 'मूल नको' हा निर्णय दोघांनीही परस्परांच्या अनुमतीने घेतला होता. त्यानंतर दोघं आपापल्या कामात एवढे बिझी झाले की मूल टाळण्यासाठी अनेक कारणं समोर आली. या वर्षी नको. या वर्षी प्रमोशन ड्यू आहे. इतक्यात नको... यावर्षी सिंगापूरला डिलर कॉन्फरन्स आहे. तिची तयारी करायला हवी... 'इतक्यात नको... इतक्यात नको...' म्हणता म्हणता वर्षं उलटत गेली.



**संवाद**
**गुरुनाथ तेंडुलकर**

ते गृहस्थ ऑफिसच्या कामात एवढे बिझी होते की मुलाबद्दल विचार करायला देखील वेळ नव्हता. इंक्रिमेट, प्रमोशन्स, नव्या नव्या असाइनमेंटस्, नवीन नवीन प्रोजेक्टस्. त्या बाईंच्या बाबतीतही हाच प्रकार होता. बिझनेस डेव्हलपमेंट, फॉरिन टूर्स, मिटिंग्ज् आणि पार्ट्या... मुलाबद्दल विचार करायला देखील सवड नव्हती.

दोघांच्याही पगाराचा आकडा वाढतच होता. गाड्यांची संख्या आणि गाड्यांची लांबी वाढतच होती. इसॉपचे शेअर्स मिळतच होते. गुंतवणूक वाढत होती. लग्न झालं त्यावेळी वन रूम किचन, पुढे टू रूम किचन... करता करता त्यांनी आठ बेडरूमच्या आलिशान पेंटहाऊसपर्यंत मजल मारली आणि... अचानक एक दिवस त्यांना जाणीव झाली की हे एवढं सारं मिळवलं पण कुणासाठी? हे जे आपण मिळवलं त्याचा उपयोग करणारं आणि उपभोग घेणारं पुढे कुणीच नाहीये. दोघांनीही डॉक्टरांकडे धाव घेतली. तोवर ते गृहस्थ साठीच्या जवळ आले होते. त्या बाईंनीदेखील वयाची पन्नाशी पार केली होती. डॉक्टरांनी तपासण्या करून स्पष्टपणे सांगितलं, 'आता स्वतःचं मूल होणं शक्य नाही. ती वेळ केव्हाच टळून गेलीये. किंबहुना कामाच्या ताणामुळे आणि सततच्या धावपळीमुळे त्या बाईंची मासिक पाळी वयाच्या पस्तिशीतच गेली होती.' आता एकच उपाय होता तो म्हणजे ॲडॉप्शन. मूल दत्तक घेणं...!

आणि त्याच कामाच्या निमित्तानं हे नवरा-बायको आमच्या घरी आले होते. माझी काही सामाजिक संस्थांमध्ये ओळख आहे. काही आश्रमाचे संचालक माझ्या परिचयाचे आहेत हे ठाऊक असल्याने हे पती-पत्नी मला भेटायला आले होते. मी त्यांची सगळी माहिती ऐकून - नोंदवून घेतली. दोघांचं वय, शिक्षण, उत्पन्न, नोकरीचे पत्ते, राहण्याचं ठिकाण, इतर माहिती वगैरे नोंदवून मी दोन दिवसांत कळवतो असं सांगितलं. आमच्या घरून निघताना त्या बाईंच्या डोळ्यांत पाणी आलं होतं,

'सर, प्लीज काहीतरी करा हो... कोट्यवधी रुपयांची दौलत कमावलीये. घरात सगळं सगळं आहे. फक्त...' बोलता बोलता त्यांच्या दबलेला हुंदका बाहेर पडलाच. मी कामाला लागलो. श्रद्धानंद महिलाश्रम, होली फॅमिली, बाल आशा ट्रस्ट, विसावा, आश्रय, आधार, वात्सल्य अनेक आश्रमात चौकशी केली. केवळ मुंबईतच नव्हे तर अगदी पुण्याला, नागपूरला, सोलापूरला देखील चौकशी केली. माझे काही मित्र कलकत्याला आहेत त्यांच्यामार्फत मदर टेरेसा आश्रमातही संपर्क साधला... पण... पण सगळीकडून एकच उत्तर आलं. `बराच उशीर झालाय...!'

मूल कायदेशीर दत्तक घेताना सरकारी नियमानुसार नवरा-बायको दोघांच्या वयाची बेरीज नव्वदहून अधिक असता कामा नये. या नियमानुसार त्या दोघांचं 'वय' उलटून गेलं होतं... मूल होण्याचं नैसर्गिक वय तर कधीच उलटलं होतं. आता तर मूल दत्तक घेण्याचं वय देखील उलटून गेलं होतं.

अत्यंत जड अंतःकरणाने मी त्यांना फोन केला आणि 'सॉरी' म्हणालो. त्यांच्या पत्नीशी तर बोलण्याचं धैर्यच माझ्यात नव्हतं. मला स्वतःलादेखील खूप वाईट वाटलं आणि त्या पती-पत्नीचा विचार करतानाच मला लिओ टॉलस्टॉयची `हाउ मज लँड अ मॅन नीडस्?' ही कथा आठवली. कथेतला तो दरिद्री माणूस अधिक जमिनीच्या आशेनं धाव धाव धावला अन् शेवटी धावता धावता उरीपोटी फुटून मेला.

आज मला अधिकाधिक जमीन मिळवण्यासाठी धावणाऱ्या त्या दरिद्री माणसाच्या जागी एका कंपनीचे डायरेक्टर असलेले, सुटाबुटात वावरणारे, परदेशी गाड्यांतून हिंडणारे ते गृहस्थ दिसले. आजवर आम्ही आमच्या नातेवाइकांत, मित्रांत त्या कुटुंबाबद्दल बोलताना मोठ्या कौतुकानं बोलत होतो. क्वचित त्यांचा हेवाही करीत होतो पण आज मात्र... आज मात्र मला त्या साहेबांची दया आली. त्यांच्या पत्नीचे शब्द पुन्हा आठवले.

'घरात सगळं सगळं आहे हो. फक्त...' त्याक्षणी हा 'फक्त' त्या सगळ्या असण्याहूनही महत्त्वाचा होता. जरा विचार करा की माणसाला सुखाने जगण्यासाठी काय काय लागतं? किती पैसा लागतो? घर किती खोल्यांचं असलं की संसार सुखाचा होतो? सोन्यासारखं आयुष्य जगण्यासाठी किती किलो सोन्याची गरज असते? या सोन्यावरून मला एकदम आठवला तो पॉप सिंगर डान्सर मायकल जॅक्सन.

या मायकल जॅक्सनने साडेसातशे कोटी डॉलर खर्चून अडीच हजार एकर जमिनीवर एक आलिशान महाल बांधला होता. लाख कोटी नव्हे तर अगदी अब्जावधी रुपये नव्हे डॉलर्स कमावले आणि उडवले. १९८८ साली लंडनच्या टाइम्सनं मायकल जॅक्सनच्या संपत्तीचं वर्णन करताना लिहिलं होतं की, त्याची संपत्ती त्याच्या वजनाच्या सहाशे पट सोन्याच्या किमती एवढी आहे. त्यावेळी मायकलचं वजन होतं साठ किलो. साठ गुणिले सहाशे म्हणजे छत्तीस हजार किलो सोन्याच्या किमती एवढी संपत्ती. एवढी प्रचंड संपत्ती कमावलेला हा मायकल जॅक्सन वयाच्या अवघ्या पन्नासाव्या वर्षी मेला. तो मेल्यानंतर त्याचं शवविच्छेदन झालं. त्यात काय सापडलं ठाऊक आहे?

शवविच्छेद करणाऱ्या डॉक्टरांना त्याच्या पोटात निरनिराळ्या औषधांच्या न विरघळलेल्या चौवीस गोळ्या सापडल्या पण अन्नाचा मात्र एक कणदेखील सापडला नाही. मरण्याच्या आधी मायकल जॅक्सन कित्तेक दिवस म्हणे जेवतच नव्हता. केवळ औषधांच्या गोळ्या घेऊन जगत होता. काय उपयोग झाला त्याच्या प्रचंड पैशाचा? पैसा असूनही सुख नसलेले अनेक उदाहणं आपण पाहतो.

पण याचा अर्थ असाही नव्हे की कोणी पैसे कमावू नयेत. पैसे जरूर कमावावे. अगदी भरपूर कमावावे. संपत्ती निर्माण करून त्या संपत्तीच्या सहाय्यानं आपली अधिकाधिक प्रगती करीत राहावं असं आपल्या भारतीय आध्यात्म विज्ञानानंही सांगितलं आहे. वेदांतातही तसा स्पष्ट उल्लेख आहे. संपत्ती कमावायलाच हवी. धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष या चार पुरुषार्थापैकी अर्थ म्हणजे संपत्ती हा एक महत्त्वाचा पुरुषार्थ आहे. पण... पण हव्या हव्याच्या हव्यासापायी आयुष्यभर केवळ पैशांशिवाय इतर काहीही कमावलं नाही असं स्वतःला वाटू नये याची काळजी घ्यावी.

संस्कृतमध्ये एक सुभाषित आहे.

*अति तृष्णा न कर्तव्या।*
*तृष्णा नैव परित्यजेत ।*
*शनै शनैश्च भोक्तव्यं ।*
*स्वयं वित्तमुपार्जितम् ।।*

**अर्थ** : आहे त्याहून अधिक अधिक मिळवण्याची हाव धरू नये किंवा इच्छांचा संपूर्ण त्यागही करू नये. आपण स्वतः कमावलेल्या संपत्तीचा हळूहळू योग्य प्रकारे उपभोग घेत जावा.

एकात्त्ववेत्याचं वचन आहे, 'कोणत्याही गोष्टीचा अतिरेक न करता सुवर्णमध्य साधला तरच आयुष्याचं सोनं होतं.'

# देवांच्या कल्याणासाठी दधीचिंचा देहत्याग

एकदा इंद्र देवाकडून देवगुरू बृहस्पतींचा अपमान झाला. त्यामुळे देवगुरू इंद्रपुरी सोडून, आश्रमात निघून गेले. इंद्रदेवाला आपली चूक कळल्यानंतर त्यांनी पश्चाताप दग्ध होऊन बृहस्पतींना विनवून आणण्याचा प्रयत्न केला, मात्र देवेंद्रला पाहताच, बृहस्पती आपल्या तपोबलाने अंतर्धान पावले. इंद्रदेव निराश होऊन परतले.



देवगुरू देव-दैत्यांच्या संघर्षात आपल्या तपोबलाद्वारे देवांचे बल वाढवून रक्षण करीत असत. मात्र आता तेच नसल्यामुळे, देवांचे बल क्षीण झाले. मदतीसाठी देव ब्रह्मदेवाकडे गेले, तेव्हा प्रथम ब्रह्मदेवांनी इंद्रदेवांची कानउघडणी केली व जोपर्यंत देवगुरू परत येत नाहीत, तोपर्यंत मुनिश्रेष्ठ त्वष्टा विश्वकर्माच्या तीन शीर असलेल्या (त्रिशिरा) विश्वरूप नामक मुलाला पुरोहित करण्याचा सल्ला दिला. त्याचबरोबर मातेकडून ते असूरवंशीय असल्याचेही सूचित केले. विश्वरूप हे आध्यात्मिक व वेदशास्त्र संपन्न असल्याने इंद्रदेवांनी त्यांना यज्ञगुरू केले. एकदा यज्ञकार्यादरम्यान विश्वरूप देवासोबत दैत्यानांही आहुती देत असल्याचे लक्षात आल्याने, क्रोधित झालेल्या इंद्रदेवांनी यज्ञ स्थळीच विश्वरूपाचा त्याचे तीनही शीर कापून वध केला.

**विशेष**
**भालचंद्र ठोंबरे**

ब्रह्मदेवाला हे कळताच, विश्वरूपच्या हत्तेमुळे इंद्रदेवाला ब्रह्महत्तेचे पातक लागल्याने, इंद्रपदावर राहण्याचाही अधिकार नसल्याचे त्यांनी मतप्रदर्शन केले. आता तरी बृहस्पतीलाच शरण जाण्याचा व त्यांना परत आणण्याचा सल्ला इंद्रदेवांना दिला. मात्र आपण तोही प्रयत्न केला, मात्र आपल्याला पाहताच, बृहस्पती अंतर्धान पावल्याचे इंद्रदेव म्हणाले. मात्र यज्ञाच्याच ठिकाणी केलेल्या या ब्रह्म हत्तेमुळे सर्व देव ऋषी-मुनी आदींनी इंद्रदेवाची निर्भत्सना केली. त्यामुळे इंद्रदेव अधिकच खिन्न व दुःखी झाले.

त्वष्टा विश्वकर्मांना जेव्हा आपल्या मुलाच्या (त्रिशिराच्या) हत्तेची बातमी कळली, तेव्हा ते अतिशय क्रोधायमान झाले. त्यांनी इंद्रदेवांच्या नाशासाठी त्वरित यज्ञ आरंभ केला व यज्ञ समाप्तीनंतर यज्ञातून एक विशालकाय दैत्य प्रकट झाला. विश्वकर्मांनी त्याचे नामकरण वृत्रासूर करून, त्यास प्रथम ब्रह्मदेवाची आराधना करून वर प्राप्त करण्याची व त्यानंतर इंद्रासह सर्व देवांचा नाश करण्याची आज्ञा केली. त्याप्रमाणे वृत्रासूर प्रथम ब्रह्मदेवाची तपश्चर्या करण्यास गेला. त्याने केलेल्या घोर तपश्चर्येमुळे प्रसन्न झालेल्या ब्रह्मदेवांनी त्याला वर मागण्यास सांगितले. तेव्हा आपणास लोखंडाच्या किंवा लाकडाच्या कडक अथवा नरम अशा कोणत्याही शास्त्राने मृत्यू येऊ नये, असा वर मागितला. ब्रह्मदेवाने तथास्तू म्हणून वर दिला. तेव्हा वृत्रासूर आपण अजिंक्य झालो, या आनंदात वेगाने इंद्र लोकावर चालून जाऊन विध्वंस व संहार करू लागला. तेव्हा इंद्रदेव विष्णूकडे गेले व प्राणरक्षणासाठी प्रार्थना करू लागले. तेव्हा भगवान विष्णू म्हणाले, मी स्वतः ब्रह्मदेव किंवा महादेव यापैकी कोणीही तुला या संकटातून वाचवू शकत नाही. तुला केवळ एकच व्यक्ती व ती म्हणजे भूलोकावरील महर्षी दधीचि ऋषीच यापासून वाचवू शकतात. त्यांनी जर आपली हाडे तुला दिली, तर त्यापासून शस्त्र बनवून, त्याद्वारे तू वृत्रासूराचा वध करू शकतो, असे सांगितले. त्याप्रमाणे इंद्रदेव महर्षी दधीचिकडे जाऊन वृत्त कथन केले. तेव्हा माझ्या देहदानानी जर पूर्ण देव लोकांचे संकट टळून भले होत असेल, तर मी त्यासाठी तयार आहे, असे म्हणून योगमायेने देहत्याग करून अस्थीरूप झाले. त्या अस्थीपासून वज्र बनवून इंद्राने वृत्रासूराला ललकारून त्याचा वध केला. अशाप्रकारे दधीचि ऋषींनी देव कल्याणासाठी प्राणाची आहुती दिली. भाद्रपद शुक्ल अष्टमीला महर्षी दधीचि जयंती साजरी केली जाते.

संपादक : **बाळासाहेब भगवान मस्के**, कार्यकारी संपादक : **सुनिल मसू डोंगरे**
हे दैनिक प्रकाशक, मुद्रक, मालक, संपादक बाळासाहेब भगवान मस्के यांनी बी. एम. प्रिंटर्स अँड पब्लिकेशन, बीड, ता. जि. बीड येथे छापून दैनिक बीड पुण्यभूमी तहसीलच्यामागे, डीपी रोड बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
(अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. दूरध्वनी - 02442 - 299084, ई-मेल - beedpunyabhumi@gmail.com
Daily Beed punyabhumi news paper owner, publisher, Edit **Balasaheb bhagwan maske** has printed at b.m. printexs, behind the tehsil, dp road, beed (Maharashtra) 431122.
Published at daily Beed punyabhumi office, behind the tehsil, dp road, beed - 431122. Phone no. (02442) 299084. Email- beedpunyabhumi@gmail.com

# नदीपात्रामध्ये चोरटे लपले; लोकांनी पात्रच स्वच्छ केले!

बीडमध्ये वाढत्या चोऱ्यांमुळे **भीतीचे वातावरण** • ॲड .आदर्श जाधव : पोलिसांनी **पेट्रोलिंग** करावी • अंकुशनगर भागात चोरट्यांचा **धुमाकूळ** • भीतीपोटी राबविला झाडेझुडपे तोडीचा **उपक्रम**

**बीड / पुण्यभूमी प्रतिनिधी**

शहरापासून जवळच असलेल्या अंकुशनगर भागात चोरट्यांनी मागील पंधरा दिवसांपासून धुमाकूळ घातला आहे. रात्रीच्या वेळी नागरिक पाठलाग करत असल्याने चोरटे याच भागातील नदीपात्रात लपून बसल्याचे वारंवार समोर आले. त्यावर नागरिकांनी शक्कल काढत लोकवर्गणी करून जेसीबी लावून नदीपात्रातील झाडेझुडपे बाजूला केली.

चोरांच्या भीतीपोटी हा उपक्रम राबविला.बीड शहरातील अंकुश नगर भागात घरांची संख्या वाढली असली तरी परिसर संपल्यानंतर मोकळा परिसर आहे. त्यामुळे चोरट्यांना चोरी करून पळण्यास संधी प्राप्त होते. दरम्यान, अंकुश नगर भागात जवळपास १५ दिवसांपूर्वी कपिल मुनी परिसरात एका घरी चोरी झाली होती, त्यानंतर रात्रीच्या वेळी चोरटे नेहमीच दिसून येऊ लागले, एका ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेऱ्यात चोरटे कैद झाले होते. चोरट्यांचा रात्रीच्या वेळी संचार वाढल्याने नागरिकांनी गस्त घालण्यास सुरुवात केली. चोरटे दिल्यानंतर त्यांचा नागरिकांनी पाठलाग केला असता चोरटे अंकुश नगर पुलाजवळ असलेल्या नदीपात्रातील काट्याकुपाट्यात लपून बसू लागले. असा प्रकार दोन ते तीन वेळा समोर आला. एका दिवशी तर नदीपात्रात लपलेल्या एका चोरट्याने नागरिकांना 'खाली या, तुमचे पाहतो' असे आव्हानच दिले. त्यामुळे भयभीत झालेल्या नागरिकांनी वर्गणी गोळा करीत जेसीबी लावून पात्र स्वच्छ केले.चोरट्यांनी अंकुशनगर परिसर टार्गेट केला आहे. अंकुशनगर, नाथ सृष्टी व लोढानगर परिसरातील नागरिकांनी लोकवर्गणी करून नदी स्वच्छतेचे काम हाती घेतले आहे. पोलिसांनी लोकभावना लक्षात घेऊन या भागात गस्त वाढवावी, अशी मागणी या भागातील नागरिकांनी केली. नदीपात्र स्वच्छ करण्यासाठी नगर पालिकेकडे पाठपुरावा केला होता, त्यांच्याकडे जेसीबीची मागणी केली होती, परंतु जेसीबी नसल्याचे सांगण्यात आले. त्यामुळे नागरिकांनी पुढाकार घेत लोकवर्गणीतून पात्र स्वच्छ करणे सुरू केले आहे.





### दहा वर्षांत केली नाही स्वच्छता

अंकुशनगर भागातील नदीपात्राची स्वच्छता मागील दहा वर्षांपासून करण्यात आलेली नाही . त्यामुळे अंकुशनगर येथील वैकुंठधाम स्मशानभूमी परि- सरातील नदीपात्रात मोठ्या प्रमाणात कचरा साचला असून, झुडपे मोठ्या प्रमाणात वाढली असल्याचे दिसून येत आहे .

### नागरिक काय म्हणतात ...

लोकवर्गणी करुन नदीपात्रातील झुडपे काढण्याचे काम सुरू आहे . चोरटे नदीपात्रात येऊन लपून बसत असल्याने नागरिकांनी एकत्र येऊन नदी पात्रातील झुडपे काढण्याचा निर्णय घेतला .

### अंकुशनगर येथील वैकुंठधाम

स्मशानभूमीसमोर असलेल्या नदीपात्रातील झाडेझुडपे काढण्यासाठी लोकवर्गणी काढण्यात आली . त्यानंतर मंगळवारी सकाळी ११ वाजता सुरु झालेले काम मध्यरात्री १२ :३० वाजेपर्यंत चालले . त्यानंतर बुधवारी सकाळी सहा वाजेपासून पुन्हा याच कामाला सुरुवात झाली . सांयकाळपर्यंत हे काम सुरू होते . नदीपात्रातील झाडाझुडपासह कचरासुद्धा काढण्यात आली .



चोरट्यांच्या भीतीपोटी नदीपात्र स्वच्छ करण्यात येत आहे . दोन दिवसांत बऱ्यापैकी नदीपात्र स्वच्छ झाले आहे . झाडेझुडपे जेसीबीच्या साहाय्याने बाजूला केली जात आहेत . **-ॲड .आदर्श जाधव, मराठवाडा अध्यक्ष : महाराष्ट्र पोलीस बॉईज संघटना**

## कर्तव्यदक्ष राहून ज्ञानार्जनाचे काम करावे

**महामुनी** : सेवानिवृत्ती गौरव सोहळा संपन्न



**दिंद्रुड / पुण्यभूमी प्रतिनिधी**

माजलगाव तालुक्यातील दिंद्रुड येथील जिल्हा परिषद प्रा. (मुलांची) शाळेचे जेष्ठशिक्षक महादेव कटारे काल शुक्रवारी (दि.२८) सेवानिवृत्त झाले. त्यांच्या सेवापूर्ती सोहळ्याचे आयोजन दिंद्रुड केंद्रातील शाळेच्या सर्व शिक्षक बांधवांनी केले होते. याप्रसंगी बोलताना जिल्हा परिषद शाळेच्या शिक्षकांनी गुणवत्ता राखून ठेवत, कर्तव्यदक्ष राहुन ज्ञानार्जनाचे काम करावे आणि आपल्या देशाचे उद्याचे भविष्य चांगल्या पद्धतीने घडवले पाहिजे, तरच पुढची पिढी सुधारेल. असे मत गटशिक्षणाधिकारी रवींद्र महामुनी यांनी व्यक्त केले.

कार्यक्रमाला विशेष अतिथी माजलगाव चे गटशिक्षणाधिकारी रवींद्र महामुनी, अध्यक्ष म्हणून केंद्रीय मुख्याध्यापक वचिष्ठ मुंडे, प्रमुख पाहुणे केंद्रप्रमुख अमृत कुलकर्णी, साधन व्यक्ती रवी आदमाने तर मुख्याध्यापक मंचक सोळंके, जेष्ठ पत्रकार बंडूजी खांडेकर, शालेय व्य. समिती अध्यक्ष नागेश वकरे, पत्रकार नवनाथ कांबळे, बाबासाहेब देशमाने, ॲड.गंभीरे,ठोंबरे, चव्हाण, भुजबळ, केकान, सोळंके, राठोड, देशमाने, पवार, अरबी, सोळंके, कटारे आदिंची प्रमुख उपस्थिती होती.येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्रा. (कन्या मुलांची) शाळेचे जेष्ठशिक्षक महादेव कटारे यांनी ३८ वर्षे केलेल्या सेवेत दिंद्रुड, वांगी व देवदहिफळ येथे कर्तव्य बजावले. यामध्ये त्यांनी श्रीक्षेत्र देवदहिफळ येथे तीन वर्षे शाळेचे मुख्याध्यापक म्हणून तर इतर ठिकाणी सहशिक्षक म्हणून काम पाहिले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मंचक सोळंके, मनोहर कटारे यांनी सुत्रसंचलन तर सिध्देश्वर बोकन यांनी आभार मानले. यावेळी परिसरातील सर्व शाळांचे कर्मचारी, मित्र परिवार व ग्रामस्थ उपस्थित होते.

## केज विकास संघर्ष समितीचा रास्तारोको!

**आक्रमक** : मूलभूत प्रश्नासाठी उतरले रस्त्यावर

**केज/पुण्यभूमी प्रतिनिधी**

केज शहरात केज नगरपंचायत व तालुका प्रशासनाच्या दुर्लक्षा मुळे अनेक मूलभूत समस्या कायम आहेत. या समस्या सोडवण्यासाठी समिती टप्याटप्याने वेगवेगळी आंदोलने करत आहे. केज शहरातील मुख्य महामार्गावरील पथदिवे तात्काळ सुरू करावेत, रोजा मोहल्ला रस्त्याचे काम तात्काळ पूर्ण करा व केज शहरासाठी मंजूर असलेले लोकनेते गोपीनाथराव मुंडे नाट्यगृहाचे बांधकाम त्वरित सुरू करा या तीन मागण्यासाठी शुक्रवारी सकाळी श्री छत्रपती शिवाजी महाराज चौकात सामाजिक कार्यकर्ते हनुमंत भोसले यांच्या नेतृत्वाखाली अर्धा तास रस्ता रोको आंदोलन केले.

वरील मागण्यासाठी समितीने यापूवीर्ही अनेक आंदोलने केली आहेत. मात्र प्रशासनाच्या आपसातील समन्वयाअभावे ही कामे प्रलंबित राहिली असल्याचा समितीने आरोप केला आहे. केज नगरपंचायत प्रशासनच्या दुर्लक्षामुळे अनेक समस्या प्रलंबित आहेत. आंदोलनस्थळी केजचे प्रभारी तहसीलदार व नगरपंच्यायतचे प्रभारी मुख्याधिकारी सचिन देशपांडे यांनी उपस्थित राहून येत्या एक महिन्याच्या आत सर्व प्रक्रिया पूर्ण करून पथदिवे सुरू करण्यात येतील तसेच पुढील तीन दिवसात रोजा मोहल्ला रोड चे काम पूर्ण केले जाईल व पुढील पाच दिवसात लोकनेते गोपीनाथराव मुंडे नाट्यगृहाचे काम सुरू करण्याचे लेखी आश्वासन दिल्यानंतर समितीने आपले आंदोलन मागे घेतले. या आंदोलनात समितीचे समन्वयक हनुमंत भोसले, नासेर मुंडे, शेषराव घोरपडे, संपत वाघमारे, आदेश देशमुख यांच्यासह नागरिक सहभागी झाले झाले होते. कार्यक्रम स्थळी पोलीस उपनिरीक्षक राजेश पाटील यांनी बंदोबस्त ठेवला.



## रस्त्यांची वाट लागली की, लावली?

**चर्चा** : अभियंता युवराज मळेकर, गुत्तेदारात गुपचूप?

**केज/पुण्यभूमी प्रतिनिधी**

केज सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत सद्या परिस्थितीत मुख्यमंत्री ग्राम सडक योजना, महाराष्ट्र सुवर्णजंयती नगरोत्थान योजना, खासदार फंड, आमदार फंड, समाजकल्याण अंतर्गत मागासवर्गीय समाज योजना२०-५९,२२-१६ हेड अंतर्गत कोट्यावधी रुपयाचे काम चालु आहेत.

हे काम फक्त कार्यकारीकारी अभियंता युवराज मळेकर, असिस्टंट अभियंता सचिन कांबळे व काळे असे तिघे मिळून आख्या केज तालुक्यातील सार्वजनिक बांधकाम विभागाचा कारभार पहातात. असिस्टंट अभियंता सचिन कांबळे हे धारूर तालुका सार्वजनिक बांधकाम विभागाचा सुद्धा काम पहातात त्या मुळे याचे पाची बोटे तुपात आहेत. कारण यांच्या शिवाय गुत्तेदाराचे कुठलेच पान हालत नाही. आता पर्यंत च्या केज तालुक्यातील निकृष्ठ कामाची केलेल्या तक्रारीत ची दखल घेऊन युवराज मळेकर यांनी कुठली कारवाई केली हे युवराज मळेकर कधी सांगु शकाल का असा प्रश्न तक्रारदार उपस्थित करतात तक्रार आली की यांची आमदणी वाढली असे समजून चलायचे. केज सार्वजनिक बांधकाम विभागात अभियंता युवराज मळेकर कधी तरी बसतात सगळ्या गुत्तेदाराच्या घोळक्यात ते केज विश्रामगृहात मांड ठोकून असतात. सद्या मार्च एण्ड च्या कामची लगबग चालु आहे त्या मुळे सद्या गुत्तेदारात व मळेकर यांच्या मध्ये गुपचूप गुपचूप मोठ्या प्रमाणात चालु आहे त्या मुळे मळेकर साहेबांचा चेहरा दिसने सुद्धा दुरापास्त झाला आहे. पण वसुली अधिकारी सचिन कांबळे जोरात आहेत. तरी केज तालुक्यातील व धारूर तालुक्यातील सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत जे कामे आहेत त्याचे लेखापरीक्षण होऊन बोगस कामे चव्हाट्यावर यावेत व जनतेच्या करातून आलेल्या निधीचा वापर कसा होतो ते जनतेस समजले पाहिजे असे आता जनतेतून बोलले जात आहे.




## नगर-मनमाड रस्तासाठी रिपाइं रस्त्यावर उतरणार

**सुरेंद्र थोरात** : ठेकेदारावर गुन्हे दाखल करा

**राहुरी / पुण्यभूमी प्रतिनिधी**

नगर ते मनमाड रस्ता कामाचा वेग अत्यंत कमी असुन काम जलदगतीने करावे ठिक ठिकाणी अर्धवट स्वरुपात काम अपूर्ण ठेवले आहे त्या मुळे अपघाताचे प्रमाण वाढले आहे या पुढे अर्धवट कामाचा ठिकाणी अपघात होऊन बळी गेला तर संबंधित ठेकेदारावर गुन्हा दाखल करावा लवकरच आर पी आय या प्रश्नी रस्त्यावर उतरणार असल्याचा इशारा जिल्हाध्यक्ष सुरेंद्र भाऊ थोरात यांनी दिला.

अनेक कारणांमुळे नगर मनमाड रस्ता चे काम रखडले आहे या कामात अनियमिता व अनिश्चितता दिसुन येते सार्वजनिक बांधकाम खाते अनेक ठिकाणी अपघाता होऊन ही जागी होत नसेल तर आर पी आय आठवले रस्त्यावर उतरून संबंधितांना जागे करेल दोन अडीच वर्षांपासून काम सुरू असून ठेकेदारांच्या मनमानी वर जर काम होत असेल अर्धवट काम चालू आसलेल्या ठिकाणी अपघात झाला त्यात निष्पाप जीव गेला तर संबंधित ठेकेदारावर गुन्हा दाखल करावा अनेक निष्पाप लोकांचा जीव या रस्त्यावर गेला आहे या पुढे अशी परिस्थिती निर्माण होऊ नये अशी खबरदारी संबंधितांनी घ्यावी लवकरच या प्रश्नी रस्त्यावर उतरणार असल्याचे त्यांनी सांगितले.



## जातीभेद निर्मूलनाचे महान कार्य केले

**मोहन व्हावळे** : छत्रपती राजर्षी शाहू महाराज जयंती उत्साहात



**परळी / पुण्यभूमी प्रतिनिधी**

छत्रपती राजर्षी शाहू महाराजांनी जातिभेद निर्मूलनाच्या कामासोबत सर्व समाजांना समान न्याय देण्याचे काम केले असे प्रतिपादन संपादक मोहन व्हावळे यांनी केले. लोकराजा छत्रपती राजश्री शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित लोकनेते गोपीनाथराव मुंडे पत्रकार भवन येथे आयोजित जयंती कार्यक्रम प्रसंगी ते बोलत होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी छत्रपती राजश्री शाहू महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. या प्रसंगी ज्येष्ठ संपादक रानबा गायकवाड, फुले शाहू आंबेडकरी अभ्यास समूहाचे इंजि. भगवान साकसमुद्रे, धनंजय आढाव, संपादक मोहन व्हावळे, प्रकाश चव्हाण, संजीव रॉय, विकास वाघमारे आदींची उपस्थिती होती. या कार्यक्रमात पुढे बोलताना ते म्हणाले की, छत्रपती राजश्री शाहू महाराजांनी सामाजिक न्यायाची भूमिका नेहमीच घेतली. सर्व समाज घटकांना न्याय देण्याचे काम केले. असे काम होता ना आज पाहायला मिळत नाही. छत्रपती शाहू महाराजांच्या विचारधारेवर काम करणारे आजचे राजकीय पुढारी फार कमी संख्येने दिसून येतात याकडेही त्यांनी लक्षवेधी केली.

## सामाजिक कार्याची घेतली दखल

**निवड** : वंजारी महासंघ सरचिटणीसपदी नागरे

**बीड / पुण्यभूमी प्रतिनिधी**

वंजारी महासंघ महाराष्ट्र राज्याच्या वतीने युवक आघाडीच्या निवडी करण्यात येत आहेत, राष्ट्र निमार्णात योगदान ही कर्तव्य आणि जबाबदारी असून नैतिक मूल्य रक्षणासोबतच संस्कृती व संस्कारक्षम पिढीच्या निर्माणसाठी एक पाऊल सामाजिक सांस्कृतिक संस्कृती टिकवण्यासाठी आपण आजवर केलेल्या अनमोल कायार्ची दखल घेऊनच, वंजारी महासंघात निवडी केल्या जातात.

त्याच माध्यमातून वंजारी महासंघ युवक आघाडीच्या राज्य सरचिटणीसपदी नाशिक येथील राजेश भाऊ नागरे यांची निवड करण्यात येत असून आपण सुसंस्कृत समाज व संस्कार पिढी घडविण्यासाठी नक्कीच योगदान द्याल आपण यापुढेही सामाजिक क्षेत्रात नवनवीन बदलांसह भावी पिढीला नवी दिशा देण्यासाठी पूर्ण क्षमतेने कार्य कराल असा विश्वास व्यक्त करून वंजारी महासंघाचे संस्थापक अध्यक्ष गणेशजी खाडे (विचारवंत,साहित्यिक, लेखक, अध्यात्मिक मार्गदर्शक, तथा संस्थापक अध्यक्ष वंजारी महासंघ) व माननीय खंडेराव मुंडे राज्य संपर्कप्रमुख यांच्या मार्गदर्शनाखाली, वंजारी महासंघ महाराष्ट्र, युवक आघाडीचे प्रदेशाध्यक्ष नितीन ढाकणे यांनी, वंजारी महासंघ महाराष्ट्र राज्य युवक आघाडीची निवड जाहीर केली आहे आणि लवकरच राज्यातील विविध निवडी जाहीर करणार असल्याचे नितीन ढाकणे यांनी सांगितले.



**दुर्लक्ष** | महावितरणच्या कारभारामुळे नागरिक हैराण

## सहा गावामध्ये विजेचा लपंडाव

**गंगामसला / पुण्यभूमी प्रतिनिधी**

माजलगाव तालुक्यातील रोषनपुरी, नागडगाव, शिंपेटाकळी, गोविंदपुर, सां चिंचोली, डेपेगांव, आळसेवाडी या तब्बल सात गावांमध्ये गेल्या महिनाभरापासून वीज पुरवठ्याची समस्या निर्माण झाली आहे. वारंवार खंडित होणाऱ्या वीज पुरवठ्यामुळे नागरिक त्रस्त झाले असून वीज वितरणचे कर्मचारी मात्र त्याकडे दुर्लक्ष करीत आहेत.

महावितरण कंपनीच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या मनमानी कारभाराचा फटका सर्वसामान्य नागरिकांना सहन करावा लागत आहे. वीज पुरवठ्यावर अवलंबून असलेले छोट्या उद्योगांना महावितरण कंपनीमुळे मोठा फटका बसला आहे. घरगुती वापरातील विजेची उपकरणे विजेच्या लपंडावामुळे निरूपयोगी ठरत आहे.

त्यात विजेचा लपंडाव सुरू असल्यामुळे कसेबसे उपलब्ध होणारे पाणीही आता मिळेनासे झाले आहे. सध्या चालू असलेल्या प्रचंड तापमानामुळे नागरिकांच्या अंगाची लाहीलाही होत आहे. वीज खंडित राहिल्यामुळे त्याचा परिणाम लघुउद्योग,पीठ गिरणी यांच्यावर होत असुन दळण दळण्यासाठी तालुक्याला जाव लागत आहे.गावातील पाणीपुरवठा खंडित होत आहे. त्यामुळे भीषण पाणीटंचाईत नागरिकांचा जीव पाण्यासाठी कासावीस झाला आहे. शेतकरी, शेतमजूर, बालके, वृद्ध, तरुण, महिला अशा सगळ्यांचेच जगणे कठीण झाले आहे. रात्रीच्या वेळेस हमखास वीजपुरवठा खंडित होत असल्याने कमालीच्या उष्णतामानामुळे नागरिकांची झोप उडाली आहे. संबंधित अधिकाऱ्यांनी ही बाब गांभीयार्ने घेऊन या गावातील हाल थांबवावे, अशी मागणी करण्यात येत आहे.



## माजलगाव येथे रक्तदान शिबिराचे आयोजन

**धोरण** :रोटरी क्लब ऑफ सिटीचा उपक्रम

**माजलगाव / पुण्यभूमी प्रतिनिधी**

माजलगाव रोटरी क्लब ऑफ माजलगाव सिटी च्या वतीने दिनांक ०१ जुलै २०२४ रोजी भव्य रक्तदान शिबीर व वृक्षरोपंन कार्यक्रम माजलगाव शहरातील देशपांडे हॉस्पिटल समता कॉलनी माजलगाव येथे आयोजित करण्यात आलेले आहे.

तरी माजलगाव शहरातील व माजलगाव परिसरातील नागरिकांना सदरील कार्यक्रमात आवर्जून सहभाग नोंदवावा असे आवाहन रोटरी क्लब ऑफ माजलगाव चे नवनिर्वाचित अध्यक्ष श्री मंगलनाथ मल्टिस्टेट चे व्यवस्थापकीय संचालक ॲड.रवींद्र कानडे व सचिव सौ. लता जोशी यांनी केले आहे. रोटरी क्लब ऑफ माजलगाव च्या माध्यमातून वर्षभरामध्ये विविध समाज उपयोगी कार्यक्रमाचे आयोजन प्रामुख्याने होत असते. सण २०२४-२५ करीता रोटरी क्लब ऑफ माजलगाव च्या अध्यक्षपदी श्री रवींद्र कानडे यांची नुकतीच नियुक्ती झाली असून लवकरच पदग्रहण सोहळा संपन्न होणार आहे. त्यांच्या अध्यक्षीय कार्यकाळामधील हा पहिला कार्यक्रम असून येत्या वर्षभरामध्ये माजलगाव शहरातील व परिसरातील नागरिक करिता विविध समाज उपयोगी कार्यक्रम राबवण्यात येणार असल्याचे रवीन्द्र कानडे यांनी सांगीतले.

